नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १४२ * * अकोला * मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## अहमदाबादेत ९२५ बेकायदा बांधकामे पाडली

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २४ :**
चांदोला तलावानंतर, गुजरातमधील अहमदाबादमध्ये आणखी एक मोठी बांधकामे पाडण्याची कारवाई सुरू आहे. शहराच्या पूर्वेकडील इसानपूर तलावाभोवती असलेली घरे आणि दुकाने पाडली जात आहेत. सोमवार सकाळपासून सुरू झालेली ही अतिक्रमण हटाव मोहीम चार टप्प्यात राबवली जाईल.

या उपक्रमांतर्गत, तलावाच्या किनाऱ्यावरील ९२५ बेकायदेशीर घरे आणि दुकाने पाडली जातील. या घरांमध्ये १,००० हून अधिक लोक राहतात. कडक पोलिस बंदोबस्तात, २० जेसीबी मशीन आणि ५०० महापालिका कर्मचारी आणि कामगारांची टीम तैनात करण्यात आली आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## धरमजी

कोणे एकेकाळी बॉलीवूड गाजवणाऱ्या धरमसिंह देओल उर्फ धर्मेंद्र या दिग्गज अभिनेत्याच्या परिपूर्ण जीवनाचा अध्याय आज समाप्त झाला. धरमजींनी आपल्या सुरुवातीच्या काळात शेतीमध्ये काम केले होते, आपण मातीशी जुळलेले आहोत हे त्यांनी अभिमानाने नेहमीच सांगितलेले होते. धरमजींनी यामुळेच कदाचित एक अतिशय सुंदर बाग उभारली होती. उमेदीच्या काळात मुंबईला आल्यावर त्यांनी दिग्गज अभिनेत्री मीनाकुमारी यांच्या सोबत अनेक चित्रपट केले तेव्हा ते नवखे होते परंतु त्यावेळी मीनाकुमारी अत्यंत प्रसिद्ध होत्या. त्यांच्या नावावर अनेक प्रसिद्ध चित्रपट होते. त्यातील काजल, पुण्यप्रसून, फकीरा हे चित्रपट सर्वांच्या स्मरणात राहिले. अत्यंत गाजलेल्या शोले मध्ये सुद्धा मीनाकुमारी एका सहाय्यक अभिनेत्रीच्या भूमिकेमध्ये दिसल्या. याशिवाय बंदिश, एक फुल चार कांटे, घराणा, मोहब्बत की कसम अशा चित्रपटांमुळे धर्मेंद्र आणि मीनाकुमारी यांची प्रेक्षकांमध्ये वाहवा झाली. मात्र धरमजींना खरी प्रसिद्धी मिळाली. ती शोलेमधील भूमिकेमुळे कारण जय आणि वीरूचे संवाद वर्षानुवर्षे प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. जय आणि वीरू यांच्या धमाल अभिनयाने हा सिनेमा बघणारे प्रेक्षक आणि सिनेमागृह अक्षरशा भारून जात असे. शोलेतील संजीव कुमार, आसरानी, अमजद खान, एके हंगल यांच्या भेटीला आता धरमजी गेलेले आहेत. धरमजी यांची पहिली पत्नी प्रकाश कौर आणि त्यांचे दोन सुपुत्र सनी देओल आणि बॉबी देओल यांच्यासोबत त्यांच्या दोन बहिणी असा धरमजींचा पहिला संसार होता. त्यानंतर ड्रीमगर्ल म्हणजेच हेमामालिनी ही संपूर्ण देशाची स्वप्नसुंदरी त्यांच्या जीवनात आली. त्यांनी दुसरा विवाह केला त्यासाठी या पंजाबच्या जट्टाने तात्पुरता आपला धर्मही बदलला. पण तो आपल्या लग्नाला अधिकृत करून आणण्यासाठी बदलला होता. यातील महत्त्वाची मोठेपणाची गोष्ट कुठली असेल तर ती त्यांची पत्नी प्रकाश कौर यांची आहे. कारण आपल्या बलदंड नवऱ्याला स्वप्नसुंदरी पसंत पडली. तेव्हा त्या गोष्टीचे आपले मन मारूनही या मोठ्या मनाच्या महिलेने स्वागत केले. हेमामालिनी यांना धरमजी यांच्याकडून दोन कन्या झाल्या. धरमजींनी आपली साडेपाचशे कोटींची संपत्ती आपल्या कुटुंबात व्यवस्थितपणे वाटून टाकली त्यामध्ये आपल्या दोन्ही पत्नींना दोन-दोनशे कोटी रुपये आणि उरलेले १५० कोटी रुपये चारही मुलींना सम प्रमाणात वाटले. मुलांसाठी त्यांनी वेगळी तजवीज केली होती. त्यांचे एक अत्याधुनिक थिएटर आहे, ते त्यांनी सनी देओलला दिले आणि त्यांच्या अनेक उत्तम हॉटेल्सची मालकी बॉबी देओलला सोपविली. त्यांनी फुलवलेल्या मोठ्या बागेचे वाटपही आपल्या दोन पत्नींना समान केले. सनी देओल याची स्वतःची प्रचंड कमाई आहे. बॉबीला तर अनेक हॉटेलमधून चांगला पैसा मिळतो आहे. आम्ही हे सर्व सांगायचे कारण असे आहे की धर्मेंद्रजींचा अभिनय आणि त्यांच्या चित्रपटाबद्दल आतापर्यंत बरीच चर्चा झालेली आहे, यापुढेही होईलच. दोन लग्न केल्यानंतर त्यांचा जो कुटुंबकबीला आहे त्यांच्यामध्ये आपल्या संपत्तीची वाटणी ज्या आदर्श पद्धतीने त्यांनी केली, ती आम्हाला महत्त्वाची वाटते. जुन्या काळातील अनेक प्रसिद्ध अभिनेत्यांचे उत्तर आयुष्य प्रचंड हलाखीत गेल्याचे आपण बघितलेले आहे. आताचे अनेक अभिनेते किंवा अभिनेत्री भविष्यकालीन तरतुदींसाठी योजनाबद्ध व्यवस्था करतात. तेच काम धरमजींनी कित्येक वर्षांपूर्वी नियोजन करून व्यवस्थितपणे करून टाकलेले होते. आपल्या मराठीतील प्रचंड लोकप्रिय असलेल्या भगवान दादा यांनी प्रचंड पैसा कमावला, लोकप्रियताही मिळवली. पण शेवटचे दिवस त्यांना अत्यंत हाल अपेष्टांत काढावे लागले ही गोष्ट कोणीही नाकारू शकत नाही. धरमजींचे जाणे निश्चितच वेदनादायक आहे तरीही त्यांनी चित्रपटाच्या मोहमयी जगात राहून आपला दुहेरी संसार यशस्वी केला आणि सुखासमाधानाने या जगाचा निरोप घेतला, त्यांना श्रद्धांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## बसच्या दोन वेगवेगळ्या अपघातात
# ११ जणांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था**
**तेनकासी/टिहरी, दि. २४ :**
तामिळनाडू आणि उत्तराखंड या दोन राज्यात झालेल्या बसच्या दोन वेगवेगळ्या अपघाता ११ जणांचा जीव गमवावा लागला. या दोन्ही अपघातात ५० पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

तामिळनाडूच्या तेनकासी जिल्ह्यात सोमवारी दोन बसेसमध्ये समोरासमोर झालेल्या धडकेत ६ जणांचा मृत्यू झाला तर ३० प्रवासी जखमी झाले.
मृतांमध्ये पाच महिला आणि एका पुरूषाचा समावेश आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता मदुराईहून सेनकोट्टईला जाणारी बस आणि तेनकासीहून कोविलपट्टीला जाणारी बस यांच्यात टक्कर झाली. पोलिसांनी सांगितले की, तपासात चालकाची चूक असल्याचे समोर आले आहे. मदुराईहून सेनकोट्टईला जाणारी बस बेपर्वाईने आणि वेगाने चालवत होती.

जखमी प्रवाशांवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काही जखमींची प्रकृती गंभीर आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो असे पोलिसांनी सांगितले. बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी जेसीबीचा वापर करण्यात आला. बसचे खराब झालेले भाग कापून त्यांना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर २५ हून अधिक रुग्णवाहिका बोलावून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. दोन्ही बसमध्ये किमान ५५ जण होते.



### बस दरीत कोसळून ५ ठार

उत्तराखंडच्या टिहरी जिल्ह्यात सोमवारी सकाळी कुंजपुरी मंदिराजवळ एक हृदयद्रावक बस अपघात घडला. कुंजपुरीकडे जात असलेली खाजगी प्रवासी बस अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि सुमारे २०० ते २५० मीटर खोल दरीत कोसळली.
या भीषण अपघातात किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून २० हून अधिक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. बसमध्ये प्रामुख्याने स्थानिक रहिवासी आणि कुंजपुरी मंदिरात येणारे भाविक होते. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार सकाळी ९:३० च्या सुमारास चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याने घसरून थेट दरीत कोसळली.
जिल्हा प्रशासन आणि एसडीआरएफ जखमींना जवळच्या रुग्णालयात नेत आहेत, तर गंभीर जखमींना एम्स, ऋषिकेश येथे रेफर करण्यात आले आहे. त्यांनी या संदर्भात स्थानिक अधिकाऱ्यांशी सतत संपर्क साधल्याचे सांगितले.
अपघाताचा आवाज ऐकून जवळच्या गावातील लोक घटनास्थळी धावले. दोरी, बांबूचे खांब आणि उपलब्ध साधनांचा वापर करून त्यांनी सर्वप्रथम जखमींना वाचवले.
काही वेळातच पोलिस, एसडीआरएफ आणि जिल्हा प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. उंच कडा आणि घनदाट जंगलात चालवण्यात आलेल्या बचाव कार्यात अनेक अडचणी आल्या, परंतु सर्वांनी एकत्र येऊन काम सुरू ठेवले.

## ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र
# यांचे निधन
### विलेपार्ले स्मशानभूमीत अंत्यसंस्कार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ :**



ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले. ८९ वर्षीय त्यांनी सोमवारी दुपारी त्यांच्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पार्थिवावर विलेपार्ले स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी देओल कुटुंबियांसह अमिताभ बच्चन, सलमान खान, संजय दत्त, आमिर खान यांच्यासह अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते.

धर्मेंद्र यांच्या निधनावर देशभरातून शोक व्यक्त केला जात असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाला एका युगाच्या अंताचे चिन्ह म्हटले आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील ही-मॅन म्हणून ओळखले जाणारे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांची गेल्या काही दिवसांपासून तब्येत चिंताजनक होती. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. काही दिवस आयसीयूमध्ये राहून उपचार घेत असताना, कुटुंबीयांनी त्यांना घरी आणले. मात्र, आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

धर्मेंद्र यांना हृदय व श्वसनाशी संबंधित समस्या कालांतराने वाढत होत्या. नोव्हेंबरच्या सुरुवातीला श्वासोच्छ्वासात त्रास झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. व्हेंटिलेटरवर राहून त्यांच्यावर उपचार सुरू होते. काही दिवसांपूर्वी त्यांच्या निधनाच्या अफवा पसरल्या होत्या, परंतु कुटुंबाने त्या खोट्या असल्याचे स्पष्ट केले होते. धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी समोर आल्यावर बॉलीवुडमध्ये शोककळा पसरली. अमिताभ बच्चन हे विलेपार्ले येथील शवागारात प्रथम पोहोचले.

धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधील लुधियाना येथे झाला. १९६० मध्ये दिल भी तेरा हम भी तेरे या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. शोले, चुपके चुपके,धर्मवीर, कर्तव्य, चाचा भतिजा, सम्राट, यांसह ३०० पेक्षा अधिक चित्रपटांत त्यांनी विविध आणि वेगळ्या भूमिका साकारल्या.

२०१२ मध्ये त्यांना भारत सरकारच्या पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रॉकी और रानी की प्रेम कहानी (२०२३) आणि तेरी बातों में ऐसा उलझा जिया हे त्यांचे अलीकडील चित्रपट होते. येणाऱ्या इक्किस चित्रपटातून त्यांची शेवटची भूमिका प्रेक्षकांना बघायला मिळणार होती. धर्मेंद्र यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीत एक अमूल्य कोहिनूर हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

## पीएम मोदी आज करणार
# अयोध्येत ध्वजारोहण

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. २४ :**



२५ नोव्हेंबर रोजी अयोध्येत होणाऱ्या भव्य ध्वजारोहण समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे. रामनगरी वधूसारखी सजवण्यात आली आहे. २५ नोव्हेंबर रोजी अयोध्येत सात ध्वजारोहण केले जातील. पंतप्रधान राम मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करतील आणि राम मंदिराच्या किल्ल्यातील सहा मंदिरांवरही ध्वजारोहण केले जाईल. समारंभात उपस्थित असलेले इतर पाहुणे या मंदिरांवर ध्वजारोहण करतील. हे सर्व ध्वज अहमदाबादमध्ये बनवण्यात आले आहेत.

राम मंदिराच्या शिखरावर फडकवण्यात येणारा ध्वज भगव्या रंगाचा आहे, जो २२ फूट लांब आणि ११ फूट रुंद आहे. ध्वजात सूर्यदेव, कोविदार वृक्ष आणि ओम चिन्ह आहेत. हा ध्वज जमिनीपासून १९१ फूट उंचीवर फडकवण्यात येईल. राम मंदिराचा वरचा भाग १६१ फूट उंच आहे, ज्यावर ध्वजस्तंभ आहे. दोरी वापरून जमिनीपासून १९१ फूट उंचीवर ध्वज फडकवला जाईल. ध्वज फडकवण्यासाठी एक बटण देखील लावण्यात आले आहे.

## न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी घेतली सरन्यायाधीशपदाची शपथ

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :**



सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी भारताचे ५३वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.
माजी सरन्यायाधीश बी.आर. गवई हे नुकतेच निवृत्त झाल्याने त्यांच्या जागी न्यायमूर्ती सूर्यकांत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे मूळ हरियाणातील हिसार येथील मध्यमवर्गीय कुटुंबाशी संबंधित आहे.
१० फेब्रुवारी १९६२ रोजी जन्मलेल्या सूर्यकांत यांनी आपल्या कारकिर्दीत पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात अनेक महत्त्वपूर्ण निकाल दिले.
२०१८ मध्ये त्यांची हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांच्या संतुलित, संवेदनशील आणि धारदार न्यायनिर्णयांच्या शैलीमुळे ते देशभरात ओळखले जातात. नवीन सरन्यायाधीश म्हणून सूर्यकांत यांचा कार्यकाळ २४ नोव्हेंबर २०२५ ते ९ फेब्रुवारी २०२७ असा असेल.

## आंदोलनात झळकले हिडमाचे पोस्टर



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :**
दिल्लीतील इंडिया गेटवर वायू प्रदूषणाविरुद्ध निदर्शने करणाऱ्या लोकांनी देशातील मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी कमांडर माडवी हिडमाचे (४४) पोस्टर झळकावले. पोस्टरमध्ये हिडमाची तुलना आदिवासी स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांच्याशी करण्यात आली होती. त्याचे जल, जंगल आणि जमिनीचे रक्षक म्हणून वर्णन करण्यात आले होते.
निदर्शकांनी माडवी हिडमा जिंदाबाद अशा घोषणा दिल्या. त्यांच्या हातात माडवी हिडमाला लाल सलाम अशा घोषणा असलेले पोस्टर्स होते. एका निदर्शकाच्या पोस्टरवर लिहिले होते, बिरसा मुंडा ते माडवी हिडमा पर्यंत, आपला जंगले आणि पर्यावरणासाठीचा संघर्ष सुरूच राहील. निदर्शनादरम्यान जमावाने पोलिसांशी झटापट केली. निदर्शकांनी पोलिसांवर पेपर स्प्रेचा वापर केला, ज्यामध्ये तीन ते चार पोलिस जखमी झाले. सोमवारी दिल्ली पोलिसांनी काही आंदोलकांना ताब्यात घेतले.

## सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



स्वप्नाळू, युवा नायक ते तडफदार-बलंदड नायक म्हणून साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि पुढे बॉलिवुडचा ही-मॅन म्हणून लौकिक मिळवेलेले ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र चित्रपट रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

धर्मेंद्र यांचा हिंदी चित्रपट सृष्टीतला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण राहिला आहे. शोले चित्रपटातील पडद्यावरील वीरू प्रमाणेच ते प्रत्यक्षातही मैत्र जपणारे होते. सहृदय आणि जुन्या-नव्या पिढीला जोडणारे, अनेकांसाठी आधार, मार्गदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. या क्षेत्रातील ज्येष्ठत्व ते तितक्याच उमद्यापणाने मिरवत असत.

एकाच वर्षात नऊ हिट चित्रपट देण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते चित्रपट सृष्टीत सक्रिय राहिले. त्यांच्या निधनाने आपल्या चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला आहे, अशा भावना फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

## एका तेजस्वी पर्वाचा अंत : उपमुख्यमंत्री अजित पवार



हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका तेजस्वी पर्वाचा अंत झाला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शोकभावना व्यक्त केल्या.
धर्मेंद्र यांच्या अभिनयात नैसर्गिकता, साधेपणा आणि मनाला भिडणारी भावनिक ताकद होती.त्यांनी अनेक पिढ्यांतील प्रेक्षकांना आपल्या अभिनयातून निखळ आनंद दिला. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे.

## स्वदेशी बनावटीची युद्धनौका आयएनएस माहे भारतीय नौदलात दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
स्वदेशी बनावटीची युद्धनौका आयएनएस माहे सोमवारी भारतीय नौदलात दाखल झाली. ही पहिली माहे-श्रेणीची पाणबुडीविरोधी आणि उथळ पाण्यातील युद्धनौका आहे, जी विशेषतः किनारी ऑपरेशन्ससाठी डिझाइन केलेली आहे.
मुंबईतील समारंभात लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी प्रमुख पाहुणे होते. द्विवेदी यांनी तिन्ही दलांच्या एकत्रित ताकदीवर भर दिला. ते म्हणाले, सशस्त्र दलांची सर्वात मोठी ताकद म्हणजे समन्वय. ऑपरेशन सिंदूर हे याचे एक उत्तम उदाहरण आहे.




## ॲग्रोव्हीजनचे कार्यक्रम आता वर्षभर
### ॲग्रोव्हीजन कृषि प्रदर्शनाचा समारोप : लाखों शेतकऱ्यांनी दिली भेट




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
वार्षिक कृषिप्रदर्शन आणि ज्ञानवर्धक परिषदा, चर्चासत्रानि परिपूर्ण अश्या ॲग्रोव्हीजनचे कार्यक्रम आता वर्षभर होणार आणि शक्य झाल्यास पुढील वर्षी अमरावती रोडवरील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ग्राउंडवर तयार होत असलेल्या कन्वेंशन सेंटर मध्ये ॲग्रो व्हिजनचे आयोजन करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचा आशावाद केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. ते चार दिवसीय आयोजनाच्या समरोपीय समारंभात बोलत होते.
यावेळी मंचावर केंद्रीय कृषि राज्यमंत्री आशीष जैसवाल, सिने अभिनेते प्रवीण तरडे, ॲग्रोव्हीजनचे आयोजक सचिव रवी बोरटकर, डॉ. सी डी मायी, पीडीकेव्ही अकोलाचे ▶▶ पान ८ वर






# धर्मेंद्र यांना श्रद्धांजली

## वीरू' आजही घनिष्ठ मैत्रीचे प्रतीक : शरद पवार



**मुंबई:** शरद पवार अभिनेते धर्मेंद यांना श्रद्धांजली वाहताना म्हणाले, 1960 च्या दशकात भारतीय सिनेसृष्टीत पदार्पण करून चित्रपटात सर्वसामान्य माणसांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या कथानकांमधून उठावदार भूमिका साकारणारे आणि भारतीय प्रेक्षकांची मनं जिंकून सिनेजगतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र देओल यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली. आताच्या तरुणाईला कल्पना नसेल पण एक पिढी त्यांच्या लकबीची, त्यांच्या केशभूषेची, वेशभूषेची चाहती होती.

## ही-मॅनची एक्झिट वेदनादायक



**मुंबई:** भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, पद्मभूषण धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायक आहे. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वाने, प्रभावी संवादशैलीने आणि हृदयाला भिडणाऱ्या अभिनयाने त्यांनी भारतीय सिनेमाला एक वेगळं स्थान प्राप्त करून दिले. 300 हून अधिक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारत त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आणि बॉलिवूडचा ही-मॅन अशी एक वेगळी ओळख प्रस्थापित केली. आज जरी एक सुवर्णयुग संपले असले, तरी धर्मेंद्र यांच्या अभिनयाची आणि संस्कारांची अमिट छाप सदैव आपल्या स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, अशा शब्दात माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या.

## गुंतागुंतीच्या जगातला सरळ माणूस हरवला : राज ठाकरे



**मुंबई:** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी धर्मेंद्र यांच्या रुपाने सध्याच्या गुंतागुंतीच्या जगातला एक सरळ माणूस हरवल्याची भावना व्यक्त केली आहे. ते म्हणाले, ज्येष्ठ अभिनेते धर्मेन्द्रजींचं निधन झालं. भारतीय सिनेमात 'सुपरस्टार' म्हणलं की त्याच्या झंझावाताचा एक काळ असतो आणि तो ओसरण्याचा पण एक काळ असतो. पण याला अपवाद म्हणजे धर्मेंद्रजी. एकापेक्षा एक सुपरहिट सिनेमे दिले, पण सुपरस्टारचं बिरुद त्यांना चिकटलं नाही म्हणा किंवा त्यांनी चिकटू दिलं नाही. मला चिकटू दिलं नाही असंच जास्त वाटतं, कारण धर्मेन्द्रजींच्या बाबतीत त्यांचं प्रतिमेहून प्रत्यक्ष उत्कट असं होतं. 1960 च्या दशकात धर्मेंद्र नावाचा एक देखणा, शरीराने अतिशय सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा सहज जाणवत असला तरी त्यात कुठेही दांडगाई नाही, अशा एका व्यक्तिमत्वाचा एक तरुण पडद्यावर झळकला. चित्रपटसृष्टीवर गारुड केलं.

## हिंदी चित्रपटसृष्टीचे एक पर्व काळाच्या पडद्याआड : सुप्रिया सुळे



**मुंबई:** राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही धर्मेंद्र यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे. प्रख्यात चित्रपट अभिनेते तथा माजी खासदार धर्मेंद्र यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांनी 300 हून अधिक चित्रपटांमधून भूमिका साकारल्या. चित्रपट रसिकांच्या मनावर त्यांनी अधिराज्य गाजविले. पंजाबमधील एका छोट्या गावातून मुंबईत येऊन त्यांनी अभिनयाच्या क्षेत्रात आपले अढळ स्थान निर्माण केले. त्यांच्या या क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या निधनामुळे हिंदी चित्रपटसृष्टीचे एक पर्व काळाच्या पडद्याआड गेले, असे त्या म्हणाल्या.

## भारतीय चित्रपट क्षेत्रातील सुवर्णयुग हरपले : विजय वडेट्टीवार



**मुंबई:** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी धर्मेंद्र यांच्या निधनामुळे भारतीय सिनेसृष्टीतील एक सुवर्णयुग हरपल्याची भावना व्यक्त केली. भारतीय चित्रपटसृष्टीतील महानायक, ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपट क्षेत्रातील एक सुवर्णयुग हरपल्याची पोकळी निर्माण झाली आहे. अभिनयातील सहजता, भूमिकांमधील विविधता आणि प्रेक्षकांवर अमिट छाप टाकण्याची विलक्षण ताकद धर्मेंद्र यांनी आपल्या कारकिर्दीत दाखवून दिली. तीनशेहून अधिक चित्रपटांमधून त्यांनी सामान्य माणसांच्या भावना मोठ्या पडद्यावर जिवंत केल्या. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. त्यांच्या परिवाराला, चाहत्यांना आणि भारतीय चित्रपटसृष्टीला ही अपरिमित हानी सहन करण्याची शक्ती मिळो, ही प्रार्थना, असे ते म्हणाले.

# मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार : मुख्यमंत्री फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत. मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित यूथ कनेक्ट कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वसोर्वा-दहिसर-भाईदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील 60 टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेसवे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णतः बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल. मुंबई वन हा एकात्मिक मोबिलिटी ॲप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्युशन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु वास्तवात परिस्थिती बदलत आहे. महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळेपेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. आजच्या लोकशाहीत युवा नागरिक फक्त दर्शक नसून स्वतःचे मत असलेले महत्त्वाचे स्टेकहोल्डर्स आहेत. युवांच्या मतांना स्थान दिल्याशिवाय लोकशाहीची प्रक्रिया पुढे जाऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पर्यावरण बदल ही केवळ पुस्तकी चर्चा नसून वास्तवातील मोठी समस्या आहे. आपण हवामान बदलाचा अनुभव घेणारी पहिली पिढी आहोत आणि त्याबद्दल काहीतरी करू शकणारी शेवटची पिढी आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे असतात, त्यामुळे मुंबईत वाहतूक व्यवस्था इलेक्ट्रिक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो संपूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. पुढील टप्प्यात सार्वजनिक वाहतुकीला पूर्णपणे शून्य-उत्सर्जनच्या दिशेने नेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक वर्षे मुंबईचे सांडपाणी थेट समुद्रात सोडले जात होते, मुंबईसारख्या महानगराचा 100 टक्के सीवेज समुद्रात टाकला जाणे योग्य नाही. त्यामुळे नियम तयार करून आता संपूर्ण मुंबईत सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स उभारत आहोत. पुढील वर्षापर्यंत 100 टक्के ट्रीटेड पाणीच समुद्रात सोडले जाईल. त्याचबरोबर धारावीच्या पुनर्विकासात 30 टक्के क्षेत्र पूर्णपणे अनडेव्हलपेबल ठेवले जाणार असून त्यामुळे प्रचंड प्रमाणात ओपन आणि ग्रीन स्पेसेस निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पंकजा मुंडे यांच्या स्वीय सहाय्यक
# अनंत गर्जेला अटक

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २४ :



राज्याच्या कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांना स्वतःच्या पत्नीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. गर्जे रविवारी मध्यरात्री 1 च्या सुमारास स्वतःहून पोलिसांना शरण आले होते. आज त्याला कोर्टापुढे हजर केले असता कोर्टाने त्याला 27 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉक्टर गौरी पालवे - गर्जे यांनी शनिवारी सायंकाळी वरळी स्थित आपल्या राहत्या गळफास लावून आत्महत्या केली होती. अनंत गर्जे व गौरी यांचा काही महिन्यांपूर्वीच विवाह झाला होता. पण त्यानंतर अनंत यांचे कथित विवाहबाह्य संबंध असल्याची बाब गौरी यांच्या निदर्शनास आली होती. या प्रकरणी गौरी यांच्या माहेरच्या लोकांनी अनंत गर्जे यांच्यासह त्यांची बहीण शीतल गर्जे - आंधळे व दीर अजय गर्जे यांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमासह इतर प्रकरणांत गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अनंत हे फरार झाले होते.

अखेर अनंत गर्जे रविवारी मध्यरात्री 1 च्या सुमारास स्वतःहून वरळी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यानंतर आज त्याला कोर्टापुढे हजर करण्यात आले. तिथे पोलिसांनी त्याच्या कोठडीची मागणी केली. त्यानुसार कोर्टाने त्याला 27 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. घटना घडली त्यावेळेस मी घरी नव्हतो, घरी पोहोचलो तेव्हा घराचे दरवाजे आतील बाजूने बंद होते. घाबरुन इमारतीच्या 31 व्या मजल्यावरुन खिडकीच्या माध्यमातून मी 30 व्या मजल्यावरील माझ्या घरात प्रवेश केला, तेव्हा गौरी गळफास घेतलेल्या अवस्थेत होती.

# बीडमध्ये ५ वर्षीय चिमुकलीवर बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. २४ :

एका 5 वर्षीय चिमुकलीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना बीड जिल्ह्यात समोर आली आहे. विशेष म्हणजे बलात्काराची घटना घडल्यानंतर गावातील काही लोकांनी सदर मुलीला तब्बल 4 दिवस उपचारासाठी जाऊ दिले नाही. तसेच तिच्या आईवरही या प्रकरणी गुन्हा दाखल न करण्यासाठी दबाव टाकला. पण अखेर आपल्या मुलीची वेदना पाहून या महिलेने पोलिस ठाणे गाठून या प्रकरणी गुन्हा दाखल केला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, नाशिक जिल्ह्यातील मालेगावच्या डोंगराळे येथील एका 3 वर्षीय चिमुकलीवर नुकताच बलात्कार व हत्या झाल्याची घटना घडली होती. या घटनेमुळे अवघे समाजमन सुन्न झाले असताना आता बीड जिल्ह्यातही अशीच एक घटना घडली आहे. बीड जिल्ह्यातील ताज्या घटनेत एका 5 वर्षीय लैंगिक अत्याचार झाला आहे. नात्यातीलच एका मुलाने हा घात केला आहे. पीडित मुलीवर सध्या बीड जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. ही घटना गत 11 नोव्हेंबर रोजी घडली. पण ती आज समोर आली.

ही घटना घडल्यानंतर गावातील काही नागरिकांनी पीडित मुलीच्या आईवर गुन्हा दाखल न करण्यासाठी दबाव टाकला. या प्रकरणी बदनामी टाळण्यासाठी त्यांनी चक्क 4 बैठका घेतल्या. या कालावधीत मुलगी तशीच तडफडत आपल्या घरी होती. ग्रामस्थांनी तब्बल 4 दिवस तिला घरीच रोखून धरले. पण मुलीच्या नातलगांना ही गोष्ट कळल्यानंतर त्यांनी थेट पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर वेगाने सूत्रे हालत शिरूर कासार पोलिसांनी गुन्हा दाखल केला. 4 दिवस वेदना असह्य झाल्यानंतर अखेर मुलीच्या आईने उपचारासाठी बीड गाठले. तिथे तिच्यावर उपचार सुरू आहेत. पीडित मातेला झाला प्रकार सांगताना अश्रू अनावर होत होते.

दुसरीकडे, बालकल्याण समितीचे सदस्य तत्वशील कांबळे यांनी या प्रकरणी शिरूर कासार पोलिसांवरही कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेची आपबिती सांगताना पीडित मुलीच्या आईला अश्रू अनावर झाले होते. पोलिसांनी या प्रकरणी पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला पाहिजे. विशेषतः या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई करणाऱ्या शिरूर कासार पोलिसांवरही कारवाई झाली पाहिजे.

## एड्स रुग्णांना उपचार पुरविण्यात महाराष्ट्र देशात अव्वल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

एड्स रुग्णांची काळजी आणि त्यांना उपचार सेवा पुरविण्यासाठी देशातील सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेद्वारे (नॅको) गौरव करण्यात आला आहे. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या राष्ट्रीय आढावा बैठकीत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. आंध्रप्रदेशातील विजयवाडा येथे १२ नोव्हेंबर रोजी झालेल्या केंद्रीय समारंभात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेला (एमएसएसीएस) या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले. नॅकोच्या काळजी आधार आणि उपचार विभागाच्या प्रमुख डॉ. चिन्मयी दास यांच्या हस्ते हा पुरस्कार एमएसएसीएसचे उपसंचालक डॉ. प्रियांका वाघेला आणि सहाय्यक संचालक प्रदीप सोनवणे यांनी स्वीकारला. हा सन्मान महाराष्ट्राच्या प्रमुख आरोग्य निर्देशाकांमधील, विशेषतः एचआयव्हीसह जगणाऱ्यासाठी अँटी रेट्रोव्हायरल थेरपी उपचार सेवा पुरवण्यात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी देण्यात आला आहे. एमएसएसीएसने आपले अव्वल स्थान मिळवले आहे. या केंद्रांनी अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

# महावितरण राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. २४ :



अमरावती येथे नुकत्याच झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत छ.संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाच्या संघाने विविध क्रीडा प्रकारांत ९ सुवर्णपदके व ९ रौप्यपदके पटकावत उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. तिन्ही परिमंडलातील पदकविजेत्या सर्व कर्मचारी खेळाडूंचा प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने यांच्या यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

महापारेषणच्या सभागृहात झालेल्या सत्कार समारंभास छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, महापारेषणचे मुख्य अभियंता जयंत विके, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, बीना सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेतील पदकविजेत्या खेळाडूंसह सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अरविंद बुलबुले, जयंत विके, मनीष ठाकरे, बीना सावंत आदी. महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेतील पदकविजेत्या खेळाडूंसह सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अरविंद बुलबुले, जयंत विके, मनीष ठाकरे, बीना सावंत आदी.

राज्यस्तरीय स्पर्धेत सांघिक खेळात व्हॉलिबॉलमध्ये राघवेंद्र कापसे, ज्ञानेश्वर गाडेकर, बाळासाहेब ढगे, रियाज शेख, हामिद सय्यद, पवन सूर्यवंशी, फेरोज तांबोळी, गजानन नीलपत्रेवार, परमेश्वर जाधव, किरण वीर, मनोज साळुंके व अमोल साळुंके यांनी सुवर्णपदक पटकावले.

आशिष खानापुरे, रोहन श्रीरामवार, किरण पवार, गजानन राऊत व विशाल साळवे यांच्या चमूने टेबल टेनिसमध्ये सुवर्णपदक पटकावले. बॅडमिंटनमध्ये गुणवंत इप्पर, दीपक नाईकवाडे, रतनसिंग दुकानदार, सय्यद अकबर, ईश्वरसिंग टेलर यांनी रौप्यपदक पटकावले. कॅरममध्ये इक्बाल खान, सचिन केळकर, केशव लटपटे, प्रमोद चौरे व शाम वाघचौरे यांना सुवर्णपदक मिळाले. ब्रिजमध्ये दीपक माने, दिलीप पवार, सतीश गुडे, ललितादास देशपांडे, सुशील ढगे, सत्यम जयस्वाल यांना रौप्यपदक मिळाले.

गोळा फेक - श्रीकांत धोत्रे (सुवर्णपदक), भालाफेक - बालाजी कांबळे (सुवर्णपदक), बुद्धिबळ - पंकज देशमुख (सुवर्णपदक), कुस्तीच्या विविध वजनगटांत मतीन शेख यांनी सुवर्ण तर विजय जगताप, अमोल मुंगळे, बलराज अलाणे व वैभव पवार यांनी रौप्यपदक पटकावले. बॅडमिंटन दुहेरीत दीपक नाईकवाडे व गुणवंत इप्पर यांना रौप्यपदक मिळाले. सहव्यवस्थापकीय संचालक जिवने यांनी खेळाडूंचे अभिनंदन करताना यापुढेही ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर महावितरणचे नाव उंचावतील,

## प्रेमविवाह केल्याच्या रागातून तरुणाच्या वडिलांवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २४ :

नात्यातील तरुणीने प्रेमविवाह केल्याने तरुणाच्या वडिलांच्या डोक्यात गज मारून खुनाचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना लोणी काळभोर भागात घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी आठ जणांना अटक केली.

अरुण छबु सोनवणे (वय ४०, रा. चव्हाण वस्ती, थेऊर, ता. हवेली) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याबाबत चव्हाण यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आठ जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज दादा शितोळे, शेखर दिलीप चव्हाण, रोशन दिलीप चव्हाण, दिलीप पंडीत चव्हाण, आईनाबाई दिलीप चव्हाण, पूजा दिलीप चव्हाण, मनीषा दादा शितोळे, उज्वला सावंत (सर्व रा. चव्हाण वस्ती, थेऊर, ता. हवेली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनवणे यांच्या मुलाने एका तरुणीशी प्रेमविवाह केला होता. तरुणी आरोपींच्या नात्यातील आहे. तरुणीने प्रेमविवाह केल्यानंतर आरोपी चिडले होते.

शनिवारी (२२ नोव्हेंबर) सकाळी साडेसातच्या सुमारास आरोपी अरुण सोनवणे यांच्या घरासमोर आले. मुलीने प्रेमविवाह केल्याने आरोपींनी चव्हाण यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांना मारहाण केली. त्यानंतर आरोपी शेखर चव्हाण याने सोनवणे यांच्या डोक्यात गज मारला. या घटनेनंतर सोनवणे यांचा मुलगा तेथे आला.

आरोपींनी सोनवणे यांच्या मुलाला मारहाण केली. खुनाचा प्रयत्न, दहशत माजविल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली. पोलीस उपनिरीक्षक बिराजदार तपास करत आहेत.

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा आज स्मृतिदिन. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले.

महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली.

१९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.

यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फूटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.

# २०४७ पर्यंत काँग्रेसला सत्ता नाही : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा माहोल चांगलाच तापला असून सर्वच पक्षांनी जोरदार प्रचारयात्रा, सभा आणि शक्तीप्रदर्शनाला वेग दिला आहे. अशातच आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वाशिममध्ये काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. निवडणूक प्रचारासाठी मालेगाव शहरात आलेल्या बावनकुळे यांनी काँग्रेसचे नेतृत्व, अंतर्गत भांडणं आणि विकासाच्या अजेंड्यावर प्रश्न उपस्थित करत महाविकास आघाडीवरही टीकेची झोड उठवली.

आपल्या भाषणात बावनकुळे यांनी असा दावा केला की, 2047 पर्यंतही काँग्रेसला केंद्रात किंवा राज्यात सत्ता मिळणार नाही. कारण काँग्रेसकडे विकासाबाबत स्पष्ट योजना नाही आणि जनतेकडून मिळणारा प्रतिसादही खूप कमी होत आहे.

महाराष्ट्रातील जनतेने 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भाजप- महायुतीला मिळवून दिलेला पाठिंबा याचे स्पष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार महायुतीला 3 कोटी 18 लाख मतं



मिळाली तर महाविकास आघाडीला 2 कोटी 18 लाख मतांवर समाधान मानावे लागले. पुढील 2029 मध्येही महायुतीच सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी काँग्रेसमधील अंतर्गत भांडणांवरही त्यांनी जोरदार टीका केली. काँग्रेसमध्ये कुणाचा पाय कुणाच्या पायात बसत नाही, अशी टीका करत त्यांनी अनेक नेत्यांची उदाहरणे दिली. विजय वडेट्टीवार, नाना पटोले, सुनील केदार, यशोमती ठाकूर आणि हर्षवर्धन सपकाळ या नेत्यांमध्ये परस्पर संवाद कमी असून निर्णयप्रक्रियेत समन्वयाचा पूर्ण अभाव आहे, असे ते म्हणाले. या विसंवादामुळेच काँग्रेस कमजोर होत चालली आहे आणि भविष्यात ही पार्टी किंचित पार्टी म्हणूनच ओळखली जाईल, असा दावा त्यांनी केला.

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या एका काँग्रेस कार्यकत्यार्चा उल्लेख करत बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसमध्ये रोज भांडणं, गटबाजी आणि फूट दिसते. त्यामुळे कार्यकर्ते नाराज होऊन पक्ष सोडत आहेत. तर दुसरीकडे महायुती सरकार राज्याच्या विकासासाठी सातत्याने काम करत आहे. विकासकामांच्या जोरावर लोकांचा विश्वास भाजपवर वाढत असून येत्या काळात हा विश्वास अजून दृढ होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. भाजप महायुती सरकार आगामी काळात अनेक मोठी प्रकल्प, उद्योग आणि सुविधा राज्यात आणणार आहे. त्यामुळे 2029 पर्यंत काँग्रेसचं अस्तित्व आणखी लहान होईल, असेही ते म्हणाले.

# डिसेंबरमध्ये लग्नाचे ३ विवाह शुभ मुहुर्त

**अकोला :** विवाह पद्धतीला हिंदू धर्मात मोठे महत्त्व आहे. विवाह म्हणजे दोन जीवांचं मिलन.. अनेकांचं स्वप्न असतं, देवा-ब्राम्हणाच्या साक्षीने मंत्रोच्चाराच्या स्वरात, डोक्यावर अक्षतांचा पाऊस, आणि सर्व नातेवाइकांच्या साक्षीने विवाह संपन्न व्हावा. तसं पाहायला गेलं तर कोणत्याही शुभ कार्यक्रमासाठी पंचांग आणि शुभ मुहूर्ताचा सल्ला घेतला जातो. विशेषतः विवाहांसाठी शुभ मुहूर्त पाळणे महत्त्वाचे आहे. शुभ विवाह भागवत एकादशी म्हणजेच देवउठनी एकादशीनंतर सुरू झाले आहेत. धार्मिक मान्यतेनुसार, २ नोव्हेंबर रोजी देवउठनी एकादशीनंतर शुभ कार्यक्रम पुन्हा सुरू झाले आहेत. देवऊठनी एकादशीला भगवान विष्णू त्यांच्या चार महिन्यांच्या योगिक झोपेतून जागे झाले. त्यानंतर देवउठनी एकादशीला शुभ कार्यक्रम सुरू झाले. भगवान विष्णू त्यांच्या योगिक झोपेतून जागे झाल्यानंतर चातुर्मास समाप्ती झाली, यानंतर लग्नासाठी शुभ काळ सुरू झाले असून, नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात अनेक शुभ विवाह तारखा आहेत. २ नोव्हेंबर, ३, ५, ८, १२, १३, १६, १७, १८, २१, २२, २३, २५, ३० नोव्हेंबर. डिसेंबरसाठी लग्नाचे ३ शुभ मुहूर्त वैदिक पंचांगानुसार, नोव्हेंबरमध्ये लग्नासाठी अनेक शुभ मुहूर्त आहेत, परंतु डिसेंबरमध्ये फक्त तीनच मुहूर्त उपलब्ध आहेत. डिसेंबरमध्ये लग्नासाठी सर्वोत्तम शुभ तारखा ४ डिसेंबर, ५ डिसेंबर आणि ६ डिसेंबर आहेत.

# मनपाच्या प्रारूप मतदार यादी वरील कोणत्याही प्रकारची हलगर्जी व दीरंघाई खपून घेतली जाणार नाही : मनपा आयुक्त

**■अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करीता मा.राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अकोला महानगरपालिका प्रशासन द्वारा दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी अकोला मनपाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे नागरिकांच्या हरकती व सुचना घेण्यासाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.



या अनुषंगाने आज दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे आढावा बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीमध्ये मनपा आयुक्त यांनी आज पर्यंत आलेल्या नागरिकांच्या हरकती व सुचना यांची माहिती घेतली, तसेच प्रारूप मतदार यादी वरील प्राप्त हरकती व सुचनांच्या अंमलबजावणी संदर्भातील कामामध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जी व दीरंघाई खपून घेतली जाणार नाही अशी स्पष्ट ताकीद दिली. तसेच या कामात प्राप्त हरकती बाबत शहनिशा करून नियमानुसार व अचूक माहिती सादर न केल्यास सदरची बाब गंभीर स्वरूपाची मानल्या जाईल व संबंधीत पथकाविरूध्द फौजदारी कार्यवाही करण्याचा ईशारा ही मनपा आयुक्त डॉ. लहाने यांनी वेळी दिला. तसेच या कामासाठी नेमून दिलेल्या सर्व कर्मचा-यांनी जे नागरिक ज्या प्रभागात वास्तव्य करतात त्यांचे नांव त्याच प्रभातील यादी मध्ये समाविष्ट आहे किंवा नाही याची खात्री करून त्या प्रकारे दुरूस्ती करून अहवाल सादर करण्याच्या सुचना यावेळी दिल्या, तसेच यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांनी सदर कामाची माहिती कशा प्रकारे संकलित करून अहवाल सादर करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या बैठकीत मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, मनपा उपायुक्त दिलीप जाधव, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, मनपा आयुक्त यांचे स्विय्य सहायक जितेंद्र तिवारी, सहा.आयुक्त राजेश सरप, गजानन घोंगे, क्षेत्रीय अधिकारी हेमंत शेळवणे, जी.आय.एस.विभाग प्रमुख चंदन प्रसाद यांचेसह बी.एल.ओ. व स्वच्छता निरीक्षकांची उपस्थिती होती.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला पोलिसांनी तात्काळ केली अटक

## पत्नीच्या चरित्रावर संशयातून संशयिताने केला जीवघेणा हल्ला; उपचारादरम्यान मृत्यू - पोलिसाची जलद कारवाई

**■अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

अकोट फाईल पोलिसांनी खुनाच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीला तात्काळ अटक करण्याची कारवाई केली. राजू नगर, अकोट फाईल येथे राहणारे शेख राजू शेख निजाम (वय ४१) व त्यांची पत्नी शेख शामिम (वय ३६) यांच्यात विभक्त होण्यासंबंधी न्यायालयीन प्रकरण सुरू होते. दोघे एकत्र राहत असतानाही पती शेख राजू तिच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याने त्यांच्यात वारंवार वाद होत होते. आज दि. २४/११/२०२५ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता झालेल्या वादात आरोपी शेख राजू याने संतापाच्या भरात घरातील धारदार चाकूने पत्नी शेख शामिम हिच्या गळ्यावर वार केले. गंभीर जखमी अवस्थेत तिला तात्काळ सरकारी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच अकोट फाईल पोलिसांनी आरोपी शेख राजू शेख निजाम याला तात्काळ ताब्यात घेतले असून अटकेची पुढील प्रक्रिया सुरू आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक टीम, डॉग स्क्वाड व पोलिस कर्मचारी पोहोचले असून सर्व पुरावे गोळा




करून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अकोट फाईल पोलिस ठाणे करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बदेली रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शेख रहीम, सपोनि जनार्धन खंडेराव, पो.उ.नि. शेख, डी.बी. पथक व इतर अंमलदारांनी संयुक्तरित्या केली.

## महिला व बालविकास कार्यालय व विविध पथकांनी

# जिल्ह्यात होऊ घातलेला एक बालविवाह वेळीच रोखला

**■अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्डलाईन, ॲसेस टु जस्टीस प्रकल्प, आय. एस. डब्ल्यू एस. ही टीम बालविवाह मुक्त अकोला हे ध्येय ठेवून कार्यरत आहे. १०० दिवसीय बालविवाह मुक्त भारत अभियान जनजागृती दरम्यान त्यांना एका गावामध्ये एका १४ वर्षीय अल्पवयीन बालिकेचा बाल विवाह एका १९ वर्षीय तरुणा सोबत जुळल्याची माहिती मिळाली. त्यानुसार संबंधित पथकाने बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, अंगणवाडी सेविकेसह बालिकेच्या घरी भेट दिली.

बालिका पालकांसह कामानिमित्त बाहेर गावी गेल्याचे समजले. तेव्हा त्यांना नोटीस बजावून बालकल्याण समिती अकोला यांच्यासमक्ष बालिकेच्या आई वडील तसेच नातेवाईक व मुलाकडील पालक यांची बैठक घेऊन बालविवाह प्रतिबंधक अधिनियमाबद्दल माहिती दिली. तसेच बालिकेचे अल्पवयात लग्न झाल्यास शारीरिक, मानसिक, शैक्षणिक होणारे दुष्परिणामांविषयी माहिती देण्यात आली.

तेव्हा मुलीचे वय १८ वर्ष पुर्ण झाल्याशिवाय लग्न करता येत नाही असे सांगितले व सर्वांचे समुपदेशन केले, बालकल्याण समितीने मुलीचे वय १८ वर्ष पुर्ण झाल्याशिवाय लग्न न करण्याबाबतचे हमीपत्र बालिकेचे व मुलाच्या आई वडिलांकडून लिहून



घेतले. त्यावेळी ग्राम पंचायत अधिकारी सचिव,, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांची साक्ष घेण्यात आली.

बालविवाह थांबविण्याच्या प्रक्रियेत मार्गदर्शन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर यांचे सहकार्य लाभले. बाल विवाह थांबविण्यासाठी मोलाचे कार्य बाल कल्याण समिती अध्यक्ष अनिता गुरव, सदस्य प्रांजली जयस्वाल, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये, ॲसेस टु जस्टीस प्रकल्प आय. एस. डब्ल्यू. एस चे जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे, राजश्री कीर्तीवर, ग्राम पंचायत अधिकारी, आणि ग्राम बाल संरक्षण समिती यांनी मोलाचे कार्य केले.

# हिवरखेड नगरपंचयातच्या इतिहासात पहिल्यांदाच मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांची प्रचारसभा

**■हिवरखेड, दि. २४ (प्रतिनिधी) :**

सर्व स्पर्शी विकासाच्या व महाराष्ट्राच्या १४ कोटी जनतेच्या कल्याणासाठी सदैव तत्पर राहणारे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री लाडक्या बहिणीचे भाऊ देवा भाऊ देवेंद्र फडणवीस हिवरखेड तेल्हारा अकोट भाजपा नगराध्यक्ष नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ हिवरखेड येथे केवळ राव देशमुख यांचा मळा एसटी स्टँड जवळ विशाल जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी सकाळी साडेअकरा वाजता २५ नोव्हेंबर मंगळवार येत असून त्याची जय तयारी सुरू आहे.

भारतीय जनता पक्षाचे स्टार प्रचारक व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली १०१ नगरसेवक व ११ नगराध्यक्ष अविरोध भारतीय जनता पक्षाचे निवडून आले असे कुशल नेतृत्व नेतृत्व देवा भाऊ देवेंद्र फडणवीस हिवरखेड येथे भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ येत असून भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे आमदार प्रकाश भारसाकडे यांच्या नेतृत्वाखाली जय तयारी सुरू असून भारतीय जनता पक्षाचे दोन हजार कार्यकर्ते या कामासाठी कामाला लागले आहे.

हिवरखेड च्या इतिहासात भव्य दिव्य ऐतिहासिक सभेसाठी तिन्ही नगरपरिषद मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून यासाठी तयारी सुरू आहे या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार एडवोकेट आकाश फुंडकर, खासदार अनु धोत्रे भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर आमदार प्रकाश भारसाकडे आमदार हरीश पिंपळे आमदार वसंत खंडेलवाल जिल्हा भाजपा अध्यक्ष संतोष



शिवरकर जयंती मसने विजय अग्रवाल तसेच भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

या सभेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व इतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे विशेष म्हणजे अयोध्या येथे याच वेळेवर धर्म ध्वज पंतप्रधान नरेंद्र मोदी व सदस्य चालक परमपूज्य डॉक्टर मोहन भागवत यांच्या हस्ते होणार आहे तसेच राम जानकी विवाह सोहळा सुद्धा त्यावेळी होणार आहे अशा या मंगलप्रसंगी मंगळवारी रोजी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहून विजयाच्या भाजपा उमेदवारांचा विजयाचा शंखनाद व आशीर्वाद देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

# अकोलामध्ये कचरा शुल्कावरील मनमानी वसुलीला उघड विरोध

## शासनाच्या परीपत्रकानुसार दर घेण्याची मागणी

**■अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

अकोला महानगरपालिका विविध धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था, दुकाने, रुग्णालये, शोरूम व व्यावसायिक आस्थापनांकडून शासनाच्या १ जुलै २०१९ च्या परीपत्रकात नमूद केलेल्या दरांपेक्षा जास्त शुल्क आकारत असल्याचा गंभीर आरोप करत आज वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक निलेश देव यांनी मनपा आयुक्तांना निवेदन दिले.निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, अकोला मनपा ही विदर्भातील एकमेव मनपा आहे जी शासनाने ठरवलेल्या मर्यादेपेक्षा जास्त कचरा शुल्क लावत आहे, तर नागपूर, अमरावती, अकोट, अचलपूरसह कुठेही अशी डोअर टू डोअर स्वतंत्र वसुली नाही.

१ जुलै २०१९ रोजी नगर विकास विभागाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार अकोला सारख्या 'ऊं वर्ग महानगरपालिकांमध्ये खालील दर प्रतिमहिना लागू आहेत :

दुकाने व दवाखाने : ६०,शोरूम :१२०,हॉटेल / उपहारगृहे : १२०,रुग्णालये :१२० ते १८०,शैक्षणिक संस्था / वसतिगृहे : ९० धार्मिक स्थळे (मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा, चर्च) : ९० मात्र प्रत्यक्षात अकोला मनपाकडून धार्मिक स्थळांवर ९० ऐवजी १५० ते ४०० पर्यंत, शाळा, वसतिगृहांवर ९० ऐवजी १५० ते ३०० पर्यंत, दुकाने-दवाखाने-शोरूम यांच्यावरही जास्त रक्कम, रुग्णालयांवर अनियमित वसुली, आणि काही ठिकाणी लंपसम प्रकारे मनमानी आकारणी होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. निलेश देव यांनी सादर केलेल्या निवेदनात हा प्रकार शासनाच्या परीपत्रकाचा व कायद्याचा स्पष्ट भंग असल्याचे नमूद केले आहे.

## थोडक्यात

### डॉक्टरांच्या सल्लयाशिवाय औषधे घेणे अपायकारक !

**अकोला :** प्रतिजैविकांचा (हुग्द्र) अविवेकी वापर थांबवा, डॉक्टरांच्या सल्लयाशिवाय औषधे घेणे आरोग्यास अपायकारक ठरू शकते, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हा प्रशासनाने केले आहे. दरवर्षी १८ ते २४ नोव्हेंबरदरम्यान जागतिक अँटीमायक्रोबियल जागरूकता आठवड) साजरा केला जातो. याचा उद्देश अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स (रें) म्हणजेच औषधांचा परिणाम कमी होण्याच्या धोक्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे हा आहे.एएमआर हा वाढता जागतिक आरोग्य धोका आहे. याचा परिणाम केवळ मानवांवरच नव्हे तर प्राणी, शेती आणि पर्यावरणावरही होतो.लोकांनी किरकोळ सर्दी, खोकला, तापयांसारख्याआजारांवर स्वतःहून प्रतिजैविके घेण्याची चुकीची सवय लावून घेतली आहे, ज्यामुळे भविष्यात जीवघेणे संक्रमणही बरे करणे कठीण होते. प्रतिजैविकांचे धोके ज्यामध्ये पचन समस्याः मळमळ, अतिसार, उलट्या, पोटदुखी, ॲलर्जीः चेहऱ्यावर सूज, पुरळ, श्वास घेण्यास त्रास काहीवेळा जीवघेणा ॲनाफिलेक्सिस बुरशीजन्य संसर्गः: ओरल थ्रश, यीस्ट इन्फेक्शन, त्वचेच्या समस्याः सनबर्नची संवेदनशीलता, खाज व पुरळ, चक्कर व थकवा, प्रतिजैविक प्रतिकार (हूग्दूहिम)- भविष्यात कोणतेही औषध काम करत नाही. आतड्याचे संतुलन बिघडणे, ए सारखे आजार, कमकुवत रोगप्रतिकारशक्ती, वारंवार होणारे संक्रमण, हाडे कमकुवत होणे, मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे म्हणाले की, 'कोणाच्या सांगण्यावरून प्रतिजैविके वापरू नका. प्रत्येक वेळी प्रतिजैविकांची गरज असतेच असे नाही. डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण डोस घेणे अत्यंत आवश्यक आहे.

# मुख्य पोस्ट ऑफीस लगतच्या रस्त्याची दुरवस्था

## रस्त्याची चाळणी झाल्याने वाहन धारक त्रस्त

**■अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

शहरातील मुख्य पोस्ट ऑफीस लगतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्याची चाळणी झाली असून दुचाकी वाहन धारक त्रस्त झाले आहेत. मात्र या महत्वपूर्ण मार्गाच्या दुरुस्तीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. मुख्य पोस्ट ऑफीसस लगत असलेल्या मार्गाने चिवचिव बाजार तसेच महापालिका, पंचायत समिती आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाता येते. हा नागरिकांसाठी पर्यायी मार्ग आहे. त्यामुळे गांधी मार्गावरील

वाहतुक टाळण्यासाठी अनेक वाहन चालक या मार्गाचा वापर करतात. या मार्गावर स्वावलंबी शाळा, गुजराती शाळा, चिवचिव बाजार, महापालिका शाळा आहे. त्यामुळे या मार्गावर विद्यार्थ्यांची अधिक वदर्ळ असते. पोस्टाचे ग्राहक देखिल या मागार्चा जास्त वापर करतात. तसेच याच रस्त्यावर ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यालय असल्याने ज्येष्ठ नागरिकांचे या मार्गावर सतत जाणे येणे असते. या मार्गाची चाळणी झाली असून मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे दुचाकी वाहनांचे अनेकदा अपघात झाले आहेत.

पावसाळ्यात या मार्गावरुन जाणे-येणे करणे अवघड जाते. मात्र या महत्वपूर्ण मार्गाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. साधे खड्डे बुजविण्याचे कामही प्रशासनाने केले नाही. रस्ता पूर्णपणे उखडल्याने या मार्गावरुन जाताना हवा आल्यास धुळीचा त्रास सहन करावा लागतो.

या मार्गावर नागरी वस्ती नसल्याने नगरसेवकांचेही या मार्गाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष झालेले आहे. प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेवून या रस्त्याचे डांबरीकरण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# नगरपरिषद निवडणुकीची अंतिम यादी अखेर प्रसिद्ध

## पातुर वासियांची उत्सुकता शिगेला

**■पातुर,दि २४ (प्रतिनिधी) :**

पातुर नगर परिषदेचे अधिकृत घोषणा होणे अद्याप बाकी असून अनेक दिवसाच्या प्रतीक्षेनंतर अंतिम मतदार यादी २१ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली तर रविवार दुपारी १२ वाजता सार्वत्रिकरीत्या नगरपरिषद कार्यालयाच्या मुख्य भिंतीवर सदर यादी प्रसिद्ध करण्यात आली असून नगरपरिषद निवडणुकीविषयी नागरिक व इच्छुकांची उत्सुकता शिगेला पोहोचल्याचे चित्र दिसून येत आहे. अंतिम यादीत सुद्धा अनेक त्रुटी असल्याचे नागरिक बोलत आहेत. अकोला जिल्ह्यात सर्वत्र निवडणुकीची धामधूम सुरू झाली असून २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे मात्र पातूर नगरपरिषद निवडणुकीपासून काही प्रमाणात सध्या तरी दूर आहे. रविवारी अंतिम यादी वर इच्छुक नगरपरिषदेचे उमेदवार तसेच नागरिक हे यादीची पाहणी करताना दुपारी नगरपरिषद कार्यालयात दिसून आले. तसेच अनेक विविध राजकीय पक्षाचे संभाव्य उमेदवार व त्यांचे समर्थक यांनी नगरपरिषद कार्यालयात यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ती पाहण्यासाठी व विकत घेण्यासाठी गर्दी केल्याचे चित्र दिसून आले. अद्यापही पातुर नगरपरिषद निवडणुकीची कुठलीही अधिकृत जाहीर सूचना निवडणूक आयोग व शासनाकडून काढण्यात आली नाही. मात्र निवडणुकीबद्दल सर्वत्र चर्चेला देव फुटल्याचे दिसून येत आहे. या अंतिम यादीमध्ये सुद्धा काही प्रमाणात त्रुटी असल्याचे व शिरला परिसरातील अनेकांची नावे आली असून तसेच शहरातील अनेकांची नावे ही हद्दीबाहेर काढण्यात आली आहे. याबाबतचा अधिकृत आकडा नगर परिषदेने अद्याप जाहीर केला नसला तरी ती नावे सुद्धा मोठ्या प्रमाणात असून त्यांना मतदानापासून वंचित राहावे लागणार नाही अशी भावना निर्माण झाली आहे. संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क आम्हालाही बजावता आला पाहिजेत यासाठी शासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज असल्याचे मतदारांचे म्हणणे आहे. पातूर नगर परिषदेच्या १० प्रभाकर मधून वीस नगरसेवक निवडून येणार असून नगराध्यक्ष हा जनतेतून निवडल्या जाणार आहे. तरी इच्छुक उमेदवारांसह नागरिकांनाही निवडणुकीच्या घोषणेची काही प्रमाणात प्रतीक्षा करावी लागण्याचे चित्र आहे. नगर परिषदेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याचे रविवारी दिसून आले. निवडणुकीची तारीख किंवा जाहीर होते याकडे पातुर वाशीयांचे लक्ष लागले आहे.

# डोंगराळे प्रकरणाचा निषेध कॅन्डल मार्च व श्रध्दांजली सभा

## सामाजिक कार्यकर्ते यांचा पुढाकार

**■अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे झालेल्या ३ वर्षांच्या मुलीच्या क्रूरतेने आणि हत्येने संपूर्ण शहर हादरले आहे. अनुकरण विजय खैरनारे यांच्याविरुद्ध जनतेचा रोष वाढत आहे. या घटनेच्या निषेधार्थ रविवारी अकोल्यात मेणबत्ती मोर्चा काढण्यात आला.अशोक वाटिका येथून शांततेत मेणबत्ती मोर्चाची सुरुवात झाली. महिला, तरुण आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अशोक वाटिका येथून हा मोर्चा निघाला आणि बस स्थानक संकुलातील हुतात्मा चौकात पोहोचला, जिथे निष्पाप मुलीला श्रद्धांजली वाहण्यात आली. या मुलीवरखैरनार यांच्याविरुद्धचा खटला जलदगती न्यायालयात चालवून त्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी फुले आंबेडकर राष्ट्रीय विद्यार्थी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र भोजने, सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे,




आक्रमण संघटनेचे जिल्हाध्यक्ष सूरज मेश्राम, अनुसूचित जाती विभाग काँग्रेस कमिटीचे महानगर अध्यक्ष पंकज वाढवे, संजय वानखडे, छत्रपती महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय वानखडे, समाज क्रांती आघाडीचे ॲड भगवान दांडी, स्वप्निल सोनोने,जयशन गुळदे विलास सरदार, चंद्रशेखर नकाशे, श्रीकांत खेडकर, सतिश तेलगोटे, संदीप खंडारे, गोपाल फुंडकर आदी जागृत नागरिक सहभागी झाले होते. यावेळी कँडल मार्चच्या समारोप समारंभात उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणात निष्पाप मुलीला न्याय देण्याची मागणी केली. सदर कॅन्डल मार्च व श्रध्दांजली सभेचे आयोजन फुले आंबेडकर राष्ट्रीय विद्यार्थी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र भोजने, सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे, यांनी केले होते.

# विनय जामनिक विभागीय थाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी पात्र...!

**■मुर्तिजापुर,दि २४ (प्रतिनिधी) :**

तालुका क्रीडा संकुल येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत मूर्तिजापूर हायस्कूलचा विद्यार्थी विनय जामनिक याने उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय स्तरासाठी भक्कम मजल मारली आहे. इयत्ता सहावीतील विनयने ३६ ते ४० किलो वजन गटात अप्रतिम कौशल्याचे प्रदर्शन करून विजय मिळवला. ही स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, क्रीडा अधिकारी मनिषा ठाकरे व तालुका क्रीडा मार्गदर्शक विनोद काळपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. अकोला जिल्हा थाई बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष आणि एम बी कराटेचे संचालक सेन्सई गंगाधर जाधव यांनी स्पर्धेच्या आयोजनात पुढाकार घेतला.विभागीय स्तरावरील पात्रतेचे श्रेय विनयने आपल्या आजी गयाबाई जामनिक, वडील मिलींद जामनिक, आई शिल्पा जामनिक तसेच नातेवाईक,शाळेचे मुख्याध्यापक अनिल देविकर, वर्गशिक्षिका किरण भास्कर, शिक्षक दिनेश खलेलकर, अमित सोळंके व इतर शिक्षक वृंद, मार्गदर्शक सेन्सई गंगाधर जाधव यांना दिले आहे.



## पिंजर पोलिसांची कानडीत वरलीधारकावर कारवाई

**बार्शिटाकळी :** पिंजर पोलिसांनी कानडीत वरली पकडून कारवाई केली आहे. पिंजर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ नोव्हेंबरला कानडीत वरलीधारकाजवळून वरलीचे साहित्य मोबाइल फोन चार हजार रुपये व नगदी ७ हजार ६८० रुपये असा ११ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# सर्व मराठा एकत्रित झाल्यास एक मोठी शक्ती निर्माण होईल : प्रा.फ.मु.शिंदे





## मराठा समाजा करिता २० कलमी विवाह आचारसंहिता जाहीर

**▪अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

मराठा समाजातील पाटील, देशमुख, कुणबी, घाटोळे पाटील, दखनी, असामी या गटांच्या विवाहाकरिता सर्वानुमते एक ‘ २० कलमी ‘ विवाह आचारसंहिता जाहीर करण्यात आली आहे. ‘ मध्यस्थी ‘ वधू वर सूचक मंडळ अकोट यांनी तयार केलेल्या या आचारसंहितेला अकोला जिल्ह्यातील विविध विवाह मंडळांनी मान्यता दिली आहे. तसेच या समाजाच्या एकत्रिकरण व बेटी व्यवहारासाठी सुद्धा समाजाचे एकमत झाले असून सर्व गटाच्या नेत्यांनी या प्रस्तावास एकमुखी संमती दिली आहे. कान्हेरी सरप येथील वेदनंदिनी ॲग्रो टुरिझम पार्क येथे संपन्न झालेल्या एका महत्त्वपूर्ण कार्यक्रमात समाजास नवी दिशा देणारे सदर निर्णय घेण्यात आले.या कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थित असलेले प्रख्यात कवी तथा मराठी रंगभूमी सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष प्रा. फ. मु. शिंदे या विषयाबाबत आपली भूमिका मांडताना म्हणाली की, मराठा समाजातील उपरोक्त सर्व घटक एकत्रित झाल्यास महाराष्ट्रात मराठा समाजाची एक मोठी शक्ती निर्माण होऊन त्याचा लाभ आर्थिक, सामाजिक व राजकीय उन्नती करिता नक्कीच होईल या वैचारिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह. भ. प. वासुदेवराव महल्ले तर प्रमुख अतिथी म्हणून सिफा, इलना, व किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष शेतकरी नेते प्रकाश पोहरे, प्रख्यात कवी फ. मु. शिंदे, सहकार नेते नानासाहेब हिंगणकर, शेतकरी सावकार ग्रस्त समितीच्या सदस्य डॉ. आशाताई मिरगे,लीलाताई शिंदे, छत्रपती अवार्ड विजेत्या ऋचा शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमास प्रामुख्याने पाटील समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर, सचिव प्रदीप खाडे, देशमुख समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष बी. एस. देशमुख, विदर्भ अध्यक्ष मधुकरराव देशमुख, प्रशांत देशमुख, कुणबी समाज विकास मंडळाचे सचिव श्रीकांत ढगेकर, मध्यस्थी वधू वर सूचक मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब फोकमारे उपस्थित होते. घाटोळे पाटील समाजाचे अध्यक्ष दिलीपराव नानोटे, कार्याध्यक्ष सहदेव शिंदे, उपाध्यक्ष नारायणराव बारड, सचिव दिलीपराव बोबडे, कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबुराव शेळके, विनायकराव पवार आदी पदाधिकाऱ्यांनी यापूर्वीच सदर आचारसंहिता व एकत्रीकरणास मंजुरी दिली आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रकाश पोहरे, अशोकराव अमानकर, डॉ. आशाताई मिरगे, वासुदेवराव महल्ले, नानासाहेब हिंगणकर यांनी याप्रसंगी आपले सडेतोड विचार व्यक्त करून समाजाच्या एकत्रिकरणावर व अनिष्ट रूढी परंपरा बंद करन्या बाबत मार्गदर्शन केले. सिफा संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन या कार्यक्रमात सर्व संघटनांच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास नंदकिशोर हिंगणकर, जयदीप सोनखासकर, अविनाश पाटील, गजानन हरणे, प्रकाश अंधारे, विठ्ठलराव गाढे, रामेश्वर सपकाळ, बाळकृष्ण आमले, पाटील समाज अर्चनाताई पाटील, वैशाली बाहकर, ॲड. दिपाली जानोरकर, , संदीप निमळ उपस्थित होते.

# मतदार यादीतील गोंधळावरून पातूर नगरपरिषद कार्यालयात ग्रामस्थांचे ठिय्या आंदोलन



**▪पातुर,दि २४ (प्रतिनिधी) :**

नगरपरिषदेच्या मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करत आज दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद मुख्याधिकारी कार्यालयात ग्रामस्थ व मतदारांनी ठिय्या आंदोलन छेडले. दुपारपर्यंत तब्बल तासभराहून अधिक वेळ हे आंदोलन सुरू राहिले. वाढत्या नाराजीमुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

आंदोलनात पातूर नगरपरिषदचे माजी नगराध्यक्ष हिदायतखान गुड्डू पैलवान, माजी पदाधिकारी मेहताब पैलवान, शेख उस्मान, आणिक पटेल यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला मतदार व युवक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान नागरिकांनी मतदार यादीतील गंभीर घोळांची यादीच मुख्याधिकाऱ्यांसमोर ठेवली. त्यामध्ये अनेक जुन्या मतदारांची नावे अचानक गायब काहींच्या नावांमध्ये स्पेलिंग व पत्त्यात गंभीर चुका एकाच घरात निवडक व्यक्तींचीच नावे ठेवून इतरांची वगळणी नवीन मतदारांचा समावेश न करणे कोणतीही पूर्वसूचना, नोटीस किंवा पडताळणी न करता नावे हटविणे ग्रामस्थांनी असा आरोप केला की या गोंधळामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकीत मतदारांना मतदानाचा मूलभूत हक्क बजावणे कठीण होणार आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये सर्वाधिक गोंधळ ८७ मतदारांची नावे वगळली विशेष म्हणजे प्रभाग क्रमांक १ मध्ये मतदारांच्या नावांच्या वगळणीचा सर्वाधिक फटका बसला आहे.सतीश सुरेश सुरवाडे (प्रभाग १, पातूर) यांनी दिलेल्या लिखित तक्रारीनुसारत्यांच्या पत्नी सुप्रिया/प्रिया सतीश सुरवाडे यांचे नाव सहित८७ पेक्षा अधिक मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत.प्रभाग १ चे बीएलओ व संबंधित कर्मचारीःयांनी कोणत्याही प्रकारची नोटीस, घरभेट किंवा पडताळणी न करता मतदारांची नावे कमी केली.सुरवाडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे नोंदणी व वगळणीसाठी वापरलेले पुरावे, कागदपत्रे आणि आधार माहिती मागितली असून, त्याबाबत पूर्ण पारदर्शकता दाखवण्याची मागणी केली आहे. २०२५-२६ च्या निवडणुका पारदर्शक व्हाव्यात यासाठी अतिरिक्त मागण्या आंदोलनकर्त्यांनी अशीही मागणी केली की पातूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ पूर्वी प्रभाग १ मधील ज्या मतदारांवर आक्षेप घेण्यात आला होतात्या आक्षेपित मतदारांची स्वतंत्र यादी प्रशासनाने जाहीर करावी जनतेला संपूर्ण माहिती न देता किंवा सुनावणी न करता नावे गायब करणे हा गंभीर प्रकार असल्याचा ठपका आंदोलनकर्त्यांनी ठेवला.प्रशासनाचे आश्वासन व आंदोलन मागे मुख्याधिकाऱ्यांकडे विविध तक्रारीं जमा झाल्यानंतर संबंधित कर्मचारी व पर्यवेक्षकांना तातडीची बैठक घेण्याचे निर्देश दिले सर्व तक्रारींची त्वरित चौकशी करण्याचे आश्वासन दिले सुधारित व अचूक मतदार यादी लवकरात लवकर प्रसिद्ध करण्याचे वचन दिले.यावर ग्रामस्थांनी आपले ठिय्या आंदोलन मागे घेतले.

## अकोट येथे वसतिगृहासाठी जागेचा शोध

**▪अकोला,दि २४ (प्रतिनिधी)**

सामाजिक न्याय विभागाच्या अकोट येथील मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहासाठी जागेचा शोध सुरू आहे.त्यासाठी सुस्थितीतील इमारत, किमान ८ हजार चौ. फु.चटई क्षेत्र असावे. ८ स्नानगृहे, ८ स्वच्छतागृहे, ८० पलंग सुव्यवस्थित ठेवता येतील. गृहपालाची राहण्याची व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था, पाण्याची पुरेशी व्यवस्था अशा पद्धतीचे बांधकाम असलेली इमारत असल्यास किमान ३ वर्षांचा इमारत करार मालकासोबत करण्यात येईल. इच्छूकांनी मुलींचे शासकीय वसतिगृह, पोपटखेड रस्ता, अकोट येथे संपर्क साधावा.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त नांदुरा येथे विशेष गाड्यांना थांबा

**▪अकोला,दि २४ (प्रतिनिधी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी नागपूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर या विशेष गाड्यांना नांदुरा स्टेशन येथे तात्पुरता थांबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर ते मुंबई विशेष गाड़ी ४ डिसेंबर रोजी नागपूर येथून सुटणारी नांदुरा



स्टेशन येथे आगमन २३.३८ वाजता आणि प्रस्थान२३.४० वाजता असेल. अन्य गाडी नागपूर ते मुंबई विशेष ४ डिसेंबरला नागपूर येथून सुटणारी नांदुरा स्टेशन येथे आगमन ५.२८ वाजता आणि प्रस्थान ५.३० वाजता असेल. नागपूर ते मुंबई विशेष गाडी ५ डिसेंबर रोजी नागपूर येथून सुटणारी नांदुरा स्टेशन येथे आगमन १३ वाजता आणि प्रस्थान १३.०२ वाजता असेल. नागपूर ते मुंबई विशेष गाडी ५ डिसेंबरला नागपूर येथून सुटणारी नांदुरा स्टेशन येथे आगमन २३.३८ वाजता आणि प्रस्थान २३.४० वाजता असेल.

## तळागाळातील रुग्णसेवेसाठी धावून जाणारा अवलिया मंगेश केनेकर

**▪पातुर,दि २४ (प्रतिनिधी) :** तालुक्यातील ग्रामीण भागातील राहणारा विरळ रुपणकल्याणासाठी व रुग्णसेवेसाठी सतत झटणारा आणि रुग्णांच्या सेवेत



गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून सतत सेवा देऊन आपली ओळख निर्माण करणारे आता प्रयन्त त्यांनी दोन हजार रुग्णांना जीवनदान दिले आहे तसेच कॅन्सर ग्रस्त व २८ लहान मुलांना नेत्रदान १५० लहान बाळाचे हार्ट सर्जरी साठी सदैव त्यांना शासनाच्या निधीतून मुंबई येथील लीलावती बीच कँडी हिंदुजा नानावटी ज्युपिटर कोकिळाबेन अंबानी आधी हॉस्पिटलमध्ये पेशंट सोबत जाऊन रुग्णसेवा दिलेली आहे अशा अवली याचा सत्कार श्री गुरुदेव जनजागृती भजन मंडळ यांच्या वतीने मंगेश भाऊ केनेकर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला आहे यावेळी मंगेश भाऊ नी केलेल्या सेवाभावी कामाची दखल घेत गुरुदेव प्रेमींकडून त्यांना राष्ट्रसंत रचित तुकडोजी महाराज यांचा ग्रंथ समर्पित केला आणी पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला असून यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजाराम भाऊ देवकर जयवंतराव पुरुषोत्तम संजू भाऊ गोतारकर भावेश भाऊ गिरोलकर गुलाबराव बोंबटकार भिका भाऊ काकड किशोर भाऊ यादव आदींची उपस्थिती होती

## शेतशिवारामध्ये अस्वलाचा मुक्तसंचार

**आलेगाव :** येथील डोणगाव रस्त्याच्या शेतशिवारामध्ये वन्यप्राणी अस्वलाचा मुक्त संचार सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर माहिती वन प्रशासनाला कळतच ते सतर्क झाले असून, पग मार्गाने शोध घेत आहेत. पातूर तालुक्यातील आलेगाव- डोणगाव मार्गावर असलेल्या शेतशिवारामध्ये शेत रखवालीकरिता शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना १९ व २० रोजी रात्रीदरम्यान अस्वलाचा मुक्त संचार सुरू असल्याचे शेतकऱ्यांनी बघितले. सोबत अनेक शेतकरी असल्यामुळे सर्वांनी आरडाओरड केल्यामुळे, सदर अस्वल पळून गेल्याचे प्रत्यक्षदर्शी शेतकऱ्यांनी सांगितले.

## रेडी मिक्स कॉंक्रीट प्रकल्पावर अभियंत्यांची कार्यशाळा




### एसीसीईच्या वतीने तांत्रिक उपक्रम

**▪अकोला,दि २४ (प्रतिनिधी) :**

मोठ्या इमारती,पूल,ऑडिटोरियम, रस्ते निर्माण आदी मोठ्या बांधकाम प्रकल्पासाठी उपयोगी पडणाऱ्या रेडी मिक्स कॉंक्रीट प्रकल्पास सिव्हिल अभियंत्यांनी भेट देत आरएमसी प्रकल्पाची तांत्रिक माहिती जाणून घेतली.राष्ट्रीय स्तरावरील असो.ऑफ कंसल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स अकोला शाखेच्या वतीने शाखेचे अध्यक्ष अभिजित परांजपे,सचिव श्याम ठाकूर,कोषाध्यक्ष संजय भगत आदींच्या पुढाकारात स्थानीय कुंभारी रस्त्यावरील जे.पी. इन्फ्रा आरएमसी प्रकल्पात हा तांत्रिक ज्ञान प्रकल्प अभियत्यांसाठी राबविण्यात आला. यावेळी प्रा इंजि.इस्माईल नजमी व इंजि अनुराग अग्रवाल यांनी उपस्थित अभियंत्यांना रेडी मिक्स कॉंक्रीटची तांत्रिक प्रॅक्टिकल माहिती देत त्यांच्या शंकांचे निरसन केले.दरम्यान असो.च्या सर्व अभियंत्यांनी प्रकल्पाची पाहणी करीत रेडी मिक्स कॉंक्रीट कसे निर्माण होते याची माहिती जाणून घेतली.सर्वप्रथम जे.पी. इन्फ्रा आरएमसी प्रकल्पाचे संचालक प्रणय अग्रवाल,ईशान अग्रवाल,आयुष अग्रवाल आदींनी उपस्थितांचे स्वागत केले.आभार असो.चे सचिव श्याम ठाकूर यांनी मानलेत.यावेळी असो.चे पंकज कोठारी,एमसी सदस्य मयूर सिंघानिया,नरेश अग्रवाल, पंकज भटकर,कपिल ठक्कर, बबलू गुप्ता, कुशल जैन,बजरंग अंभोरे, रिजवान कुरेशी,निखिल टावरी आदि उपस्थित होते.

## थोडक्यात

### प्रा.दीपाली तंबाखे-सोसे यांना (पीएच.डी.)आचार्य पदवी जाहीर



**अकोला :** येथील प्रख्यात लेखिका, मराठी भाषेच्या गाढ्या अभ्यासक,शिक्षणतज्ञ,'आनंदी गुरुकुल' ग्रूप ऑफ एज्युकेशन च्या संस्थापक, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय संशोधन केंद्र वाशिमच्या संशोधक विद्यार्थीनी प्रा.दीपाली तंबाखे- सोसे यांना नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीची आचार्य पदवी (पीएच.डी.) जाहीर झाली आहे. त्यांनी श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय संशोधन केंद्र, वाशिमच्या केंद्रप्रमुख तथा विद्यार्थीप्रिय प्रा.डॉ.सुनिता राठोड-गोरे यांच्या मार्गदर्शनात हे यश मिळिवले आहे. त्यांनी 'यवतमाळ जिल्ह्यातील उमेद अभियानात सहभागी असणाऱ्या महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत झालेल्या बदलांचे अध्ययन'(अभ्यास क्षेत्र- यवतमाळ जिल्हा) या विषयावर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे अभ्यासपूर्ण शोध प्रबंध सादर करून आचार्य पदवी (पीएच.डी.) या उच्च पदवीसाठी पात्र ठरल्या आहेत.प्रा. दीपाली आतिश सोसे यांनी आजवर एम.ए. (मराठी).,एम.ए.(इतिहास)., एम.एड.,एम.एस.डब्ल्यू., एम.फिल., रंगभूमी आणि अभिनय या विषयांमध्ये पदविका,नाटक आणि रंगमंच यामध्ये पदव्युत्तर पदविका,समुपदेशनामध्ये पदविका प्राप्त करून विविध विषयांवरील ज्ञान संपादन केले आहे. त्यांनी 'नाट्यशास्त्र' या पदविकेमध्ये महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक तर बी.एड. सीईटी या परीक्षेमध्ये महाराष्ट्र राज्यातून नवव्या क्रमांकाने गुणवत्ता यादीत झळकून बहुमान प्राप्त केला होता. त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या पाणलोट विभागात 'जिल्हा प्रशिक्षण समन्वयक' म्हणून तसेच महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालयात पदव्युत्तर विभागात अध्यापनाचे कार्यही केले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'अभिजात मराठी' आणि 'माय मराठी' या 'वर्ग नर्सरी ते वर्ग आठवी'पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांचा समावेश सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये मागील तीन वर्षांपासून केला गेला आहे. मराठी भाषा प्रचार आणि प्रसार तसेच समाजकार्य या विषयांमध्ये सुद्धा रुची घेत त्यांनी आजवर अनेक समाजपयोगी उपक्रम राबविले आहेत. सध्या त्या सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पदव्युत्तर मराठी विभागामध्ये कार्यरत आहेत. आजवर त्यांची विविध विषयांवरील एकूण ६५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी अकोला जिल्हा तरुणाई मराठी साहित्य संमेलनाचे आणि नागपूर येथील राज्यस्तरीय मनमंथन मराठी साहित्य संमेलनाचे 'संमेलनाध्यक्ष' पदही भूषविले आहे. त्यांना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील आतापर्यंत एकूण पंचावन्न प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना डॉक्टरेट जाहीर झाल्याबद्दल त्यांचे शिक्षण,साहित्य, प्रशासकीय,सामाजिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

### बालदिनानिमित्त अंगणवाड्यामध्ये विविध उपक्रम

**अकोला :** एकात्मिक बाल विकास शहरी प्रकल्प, अकोला अंतर्गत बालक दिनाचे औचित्य साधून विभागातील सेविका व पर्यवेक्षकांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अंगणवाड्यामधील चिमुकल्यांनी छोट्या छोट्या खेळांच्या मोहक स्पर्धा, बडबडगीत सादरीकरण, गाणी, गोष्टी सादर करून उपस्थितांचे मनमोहन केले. या कार्यक्रमात पालकांना बालकांच्या विकासा संदर्भातील सर्वांगीण महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. बालकांचे आरोग्य, पोषण, मानसिक व बौद्धिक विकास कशाप्रकारे घडवावा याबाबत प्रवेशिका विद्या देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकातून पालकांना मार्गदर्शन केले. मुलांना गुलाबाचे फूल देऊन स्वागत करताना त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याचा थोडक्यात परिचयही करून दिला. कार्यक्रमाच्या शेवटी मुलांना चॉकलेटचे वाटप करून बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Educational Documents
---------From----------
**VIJAY ASHOK PARANKAR**
---------TO--------------
**VIJAY ASHOKRAO PARANKAR**
My Residential Address is :- Ambika Mata Mandir Jawal Galli No 2 Gajanan Nagar Dabki Road Juna Shahar Akola 444002.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My HUSBAND Passport **No is :- (G7760444)**
---------From----------
**ANISA KHATOON ISRAR HUSAIN KHAN**
---------TO--------------
**ANISA BEE ISRAR HUSAIN KHAN**
My Residential Address is :- At Post Adgaon khurd Tq. Akot Dist. Akola 444126


## श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिशन तोष्णीवाल महाविद्यालयात ७८ वा एन.सी.सी. स्थापना दिवस उत्साहात साजरा

**▪मुर्तिजापुर,दि २४ (प्रतिनिधी) :**

दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिशन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयाच्या एन.सी.सी. विभागाच्या कॅडेट्स तर्फे २३ नोव्हेंबर २०२५ रोजी ७८ व्या एन.सी.सी. दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी.जी. गोंडाने, मुख्य अतिथी डॉ. हर्षवर्धन देशमुख, तसेच महाविद्यालयाचे एन.सी.सी. विभाग प्रमुख असोसिएट एन.सी.सी. ऑफिसर कॅप्टन डॉ. अनिल तिरकर उपस्थित होते. या प्रसंगी पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एन.सी.सी. कॅडेट्सनी उत्साहाने व आनंदाने सहभाग नोंदवला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक



कॅडेट मानसी दळवी , द्वितीय क्रमांक वैष्णवी हरसुरकर आणि तृतीय क्रमांक कॅडेट आरती कौडेकर तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक कॅडेट मधुरा नर्सिंग, कॅडेट गायत्री इंगळे, कॅडेट प्रांजल लांडगे, कॅडेट नैतिक घोडे यांनी पटकावले. कार्यक्रमात अतिथींच्या मौल्यवान विचारांनी कॅडेट्समध्ये नवीन प्रेरणा निर्माण केली. एन.सी.सी. विभागाच्या पुढाकाराने घेतलेल्या या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, महिला सुरक्षा, व्यसनमुक्ती, सायबर क्राइम, शिक्षण,स्वच्छता, आरोग्यजागरूकता अशा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी,

## मानसिक आरोग्य पुनर्वसन संस्था अंतर्गत भरती सुरू

**अकोला :** राष्ट्रीय मानसिक आरोग्य पुनर्वसन संस्था अंतर्गत उपनिबंधक, प्रशासकीय अधिकारी पदांच्या जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहे. नोव्हेंबरपर्यंत ऑफलाइन पद्धतीने उमेदवारांना अर्ज करायचा आहे. शैक्षणिक पात्रता पदाच्या आवश्यकतेनुसार नमूद करण्यात आली आहे. दिग्दर्शक, राष्ट्रीय मानसिक आरोग्य पुनर्वसन संस्था, भोपाळ- इंदूर महामार्ग, शेरपुर, सीहोर, मध्य प्रदेश या पत्त्यावर अर्ज करावा, असे आवाहन केले आहे.


RNI NO-46973/1986

Mahasagar Akola

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८

महासागर अकोला

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ेमला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# रूसू बाई रूसू कोपऱ्यात बसू?

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक गमतीदार किस्से घडत असतात. लहान मुलांसारखे आरोप प्रत्यारोप व रुसवे फुगवे हे तर कायमचेच असतात. सर्वात रुसणारा नेता कोणता? तर नाव समोर येते एकनाथ शिंदे यांचेच. रुसल्यानंतर त्यांचा रुसवा काढल्यानंतर पुन्हा ते कार्यरत होतात. त्यांच्या या बालीश राजकारणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचे हसे होत आहे. राज्यातील घडामोडींवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली की, ते एकतर त्यांच्या मूळगावी दरे येथे जातात, नाहीतर तातडीने दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतात. तसा आशय असलेले अनेक मीम्स सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होतात.

दिल्लीत गेल्यावर 'रुसु बाई रुसु कोपऱ्यात बसू' ही त्यांची भूमिका असते. मात्र तेथे त्यांच्या पाठीवरून हात फिरताच भाजपचे गोडवे गात ते पुन्हा महाराष्ट्रात येतात. आता हे कायमचे झाले म्हणून त्यांच्या दिल्ली वारीकडे सगळ्यांनीच दुर्लक्ष करायला सुरुवात केलेली दिसते. राज्यात सत्ताधारी शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्यातील अंतर्गत संघर्ष विकोपाला गेला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

यावेळी शिंदेंनी महायुतीत निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी शिंदेंनी तब्बल ५० मिनिटे अमित शाह यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. तसेच त्यांनी शिवसेनेच्या नाराजीची कारणे थेट केंद्रीय नेतृत्वापुढे मांडली. यावेळी शिंदेंनी थेट भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची तक्रार अमित शाहांकडे केली. तसेच रवींद्र चव्हाण यांच्या कार्यशैलीवर तीव्र आक्षेप नोंदवला. रवींद्र चव्हाण यांच्यामुळेच महायुतीत मिठाचा खडा पडत आहे, असे शिंदे यांनी स्पष्टपणे सांगितले. यासोबतच त्यांनी अमित शाहांकडे इतर अनेकही मुद्दे मांडले. महायुतीच्या उमेदवारांविरुद्ध बंडखोरी करणाऱ्या स्थानिक नेत्यांना चव्हाण यांच्याकडून आर्थिक पाठबळ पुरवले जात आहे. भाजपमध्ये मित्र पक्षातील नेत्यांना पक्षप्रवेश देण्यासाठी पैशांचा गैरवापर होत आहे. मित्र पक्षातील नेत्यांना फोडण्याच्या भाजपच्या आक्रमक रणनीतीमुळे युतीधर्म पाळला जात नाही. ही कृती शिवसेनेच्या नेत्यांचे मनोधैर्य खच्चीकरण करणारी आहे, असे त्यांनी शाहांना दिलेल्या तक्रारीत म्हटले. खरं म्हणजे शिंदे यांनी चव्हाणांकडून पक्ष फोडण्यासाठी पैसे दिले जातात हा आरोप केल्यानंतर, महाराष्ट्रातील जनतेत हास्याची लाट उसळली असेल. ज्या माणसांने खोक्याने पैसा वाटून स्वतःचा मूळ पक्ष फोडला, त्यांनी पैसे वाटपाचा आरोप करावा तरी का? अशी चर्चा जनतेमध्ये नक्कीच झाली असेल.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची शिंदेंना मोठी एलर्जी दिसते व त्यांना भाजपचे पूर्वीचे प्रदेशाध्यक्ष खूप जवळचे वाटू लागले आहेत. भाजपचे पूर्वीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकाळात उत्तम समन्वय होता. मात्र चव्हाण यांच्या भूमिकेमुळे महायुतीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा शिंदेंचा आरोप आहे.

रवींद्र चव्हाण यांचे हेच धोरण सुरू राहिल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि महत्त्वाच्या निवडणुकीत महायुतीला मोठे राजकीय नुकसान सहन करावे लागेल, अशी भीती शिंदेंनी व्यक्त केली. सध्या महायुतीसाठी चांगले वातावरण असताना, काही नेत्यांच्या विधानाने आणि कृतीने हे वातावरण दूषित होत आहे. त्यामुळे माध्यमांमध्ये बोलताना नेत्यांना संयम राखण्याची समज द्यायला हवी. याबद्दल तत्काळ कृती करुन तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणीही त्यांनी केल्याचे कळते.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

प्रसार माध्यमांना ज्यावेळी ही बातमी कळाली, त्यावेळी सर्वांनी मीडियामध्ये तसे वृत्त प्रसारित केले. मात्र एकनाथ शिंदेंनी ही चर्चाच फेटाळून लावली. रवींद्र चव्हाण यांच्याबाबतचा विषय संपला आहे. त्या विषयाला मी गांभीर्याने घेत नाही आणि घेणारही नाही.

सदर विषय दिल्लीत आणायचे कोणतेही कारण नाही. शाहां बरोबरच्या बैठकीत आमच्या लोकांना जे सांगायचे ते मी सांगितले आहे, असे अनाकलनीय विधान त्यांनी केले. विशेष म्हणजे स्वतःच्या पक्षात बेछूट विधाने करणारे आमदार असताना भाजपच्या नेत्यांबद्दल त्यांनी आक्षेप घ्यावा याला काय म्हणावे?

डोंबिवलीत शिंदेंच्या शिवसेनेच्या चार नगरसेवकांनी रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला होता. हा प्रवेश शिंदेंच्या खूपच जीवारी लागलेला दिसला.

या फोडाफोडीच्या राजकारणामुळे संतप्त झालेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीवरही बहिष्कारही टाकला होता. जर बहिष्कार टाकायचाच होता तर स्वतः देखील त्यांनी गैरहजर असायला हवे होते. म्हणजे स्वतः मंत्रिमंडळाच्या बैठकीला हजर व्हायचे आणि बाकीच्या सहकाऱ्यांना तुम्ही गैरहजर राहून नाराजी व्यक्त करा, असे सांगायचे. याचाच अर्थ शिंदेंनी आता महायुतीत राजकारण सुरू केलेले दिसते.

### मी रडणारा नाही तर लढणारा आहे

बिहारमध्ये एनडीएचा विजय झाला असला तरी महाराष्ट्रात मात्र एनडीएत वाद सुरू आहेत. त्यामुळे नाराजीतून ही भेट झाली का? असा प्रश्न यावेळी एकनाथ शिंदे यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, तक्रारीचा पाढा वाचून रडणारा एकनाथ शिंदे मुळीच नाही. मी रडणारा नाही तर लढणारा आहे. छोट्या मोठ्या तक्रारी आम्ही राष्ट्रीय पातळीवर आणत नसतो. मंत्रिमंडळाच्या बैठकीवर शिवसेनेच्या मंत्र्यांनी बहिष्कार टाकला होता. त्यानंतर दिल्ली वारी झाली का? असाही एक प्रश्न शिंदे यांना विचारण्यात आला होता. या प्रश्नावर ते म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे प्रश्न इथे राष्ट्रीय पातळीवर मांडायचे नसतात. काल मुख्यमंत्र्याबरोबर बसलो, आमची चर्चा झाली. त्यातून महायुतीला गालबोट न लावण्याचा निर्णय घेतला. महायुतीच्या प्रत्येक पक्षाच्या नेत्याला काल सूचना दिल्या गेलेल्या आहेत. बिहार निवडणुकीत एनडीएचा मोठा विजय झाला. या विजयाबद्दल अभिनंदन करण्यासाठी मी शाह यांची भेट घेतली, असे त्यांनी माध्यमांना सांगितले. बिहारमध्ये एनडीएचा देदीप्यमान असा विजय झाला. घटकपक्ष म्हणून शिवसेनेलाही या विजयाचा आनंद झाला, असे सांगून विषय त्यांनी दुसरीकडे नेल्याचे सर्वांना जाणवले.

### जे पेरले तेच उगवले

नगरपालिका, नगरपंचायती निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेतील नेते भाजपमध्ये जात आहे. शिवसेनेतील गळती सुरुच आहे. शाह यांच्या भेटीत शिंदे यांनी तक्रारींचा पाढा वाचला आहे. त्यांच्या पक्षाचे लोक फोडले जात आहेत. राज्यात सध्या सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपकडून ऑपरेशन लोटस घडवून मित्रपक्षांनाच सुरुंग लावला जात आहे. त्यांचे राजकारण दशकानुदशके असेच सुरू आहे. तरीही या प्रकरणाचे हादरे शिंदे गटाला जास्त बसले. मुळात ज्यांनी स्वतःच्या पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून सत्तेसाठी भाजपबरोबर जाण्याचा निर्णय घेतला होता, त्यांना नाराजीचा राग आळवण्याचा नैतिक अधिकार आहे का? भाजपनेही इथून पुढे प्रवेश होणार नाहीची जी फुंकर घातली ती याच जातकुळीची आहे. आता शिंदेपुढे दुसरा पर्याय तरी कुठे आहे? तेव्हा ऑपरेशन लोटस वगैरेच्या नावाने त्यांनी गळा काढण्यात काहीच अर्थ नाही. शिंदेंनी जे पेरले त्याचीच फळे त्यांना मिळत आहेत. भाजपने त्यांना फोडले तेव्हा आनंदाने आणि सत्तालोभाने स्वतःला फोडून घेतले. आता भाजप त्यांच्याही गटाचे लचके तोडतोय म्हटल्यावर बोंब मारून काय होणार? 'तुका म्हणे आता, उगी राहा जे जे होईल ते ते पहा' ही भूमिका शिंदेंना स्वीकारावीच लागेल.

असे कळते की, अमित शाहांच्या भेटीनंतर शिंदेंनी आपल्या मंत्री आणि पदाधिकाऱ्यांनाही दम (?) भरला आहे. मित्र पक्षातील संभाव्य पक्षप्रवेश थांबवा आणि महायुतीत वितुष्ट येईल असं काम कोणीही करू नये, अशा शब्दात त्यांनी आपल्या मंत्री आणि पदाधिकाऱ्यांना तंबी दिली आहे. त्यामुळे आता भाजपचे स्थानिक नेते त्यांच्या पक्षात येणाऱ्या लोकांना रोखणार का?

त्यांनी जरी रोखले तरी ज्यांना पक्ष सोडायचा आहे ते पक्ष सोडणार नाही का? असे अनेक प्रश्न निर्माण होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका तोंडावर असताना राज्यातील राजकारणात राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

सत्ताधारी महायुतीत एकमेकांच्या पक्षातील नेत्यांना प्रवेश देण्यावरून घटक पक्षातील नाराजी उघड झाली आहे. पण शिंदेंच्या नाराजीला भारतीय जनता पक्ष कधीही भीक घालणार नाही, याची खात्री राजकीय क्षेत्रातील जाणकारांना आहे.

# तीर्थयात्रेतील लुटारू

नुकतीच एक रील पाहण्यात आली ज्यामध्ये सोलापूर अक्कलकोट मार्गावर चालणाऱ्या भावनिक लुटीवर रील बनवणाऱ्या महिलेने प्रकाश टाकून लोकांना सजग राहण्याचा सल्ला दिला आहे.

या रिलमध्ये त्या महिलेने आपला अनुभव सांगताना म्हटले आहे, कि ती या मार्गावरून कारने जात असताना एक युवक पाण्याची रिकामी बाटली दाखवत गाडीला थांबण्याची विनंती करताना दिसला. त्यांना पाणी हवे असेल, म्हणून महिलेने गाडी थांबवून आपल्या जवळ असलेल्या पाण्याच्या कॅनमधून सदर तरुणाला पाण्याची बाटली भरून दिली. बाटली भरून देत असताना त्या तरुणाने आम्ही शेगाव येथून आलो असून अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनाला चाललो आहोत असे सांगितले.

त्या तरुणासोबत त्याची पत्नी भासणारी एक तरुणी सुद्धा होती, अशी अनेक जोडपी त्यांच्या सोबत मागोमाग चालत होती. त्यांच्या हातात भगवे ध्वज होते. आमच्यासोबत आणखीही बरेच जण असून त्यांनी सर्वांच्या जेवणासाठी पैशाची मागणी केली. सदर महिलेने स्वतःजवळील दोनशे रुपये दिल्यानंतर तेवढे पैसे पुरणार नसल्याचे तरुणाने सांगितलेः आपल्याकडे तेव्हढेच पैसे असल्याचे सांगत महिला आपल्या गाडीने तिथून निघून गेली.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

रस्त्यात भेटलेली मंडळी खरंच स्वामींच्या दर्शनासाठी जात आहेत की लोकांची भावनिक लूट करत आहेत याविषयी शंका आल्याने महिलेने पुढे जाऊन युटर्न घेऊन गाडी पुन्हा त्याच मार्गाने नेली, तेव्हा ज्याने आधी पाण्याची रिकामी बाटली दाखवत गाडी थांबवली तोच तरुण पाण्याची रिकामी बाटली दाखवत गाड़ी थांबवण्याचा प्रयत्न करताना दिसला. त्यांच्या जवळ जाताच आपली चोरी पकडली गेल्याचे त्यांच्या लक्षात आले आणि ते जोडपे तोंड लपवण्याचा प्रयत्न करू लागले.

नोव्हेंबर-डिसेंबर मासांत अनेक जण कुटुंबासह सहलीला आणि देवस्थानांना दर्शनासाठी निघतात. प्रवासात अधिक वेळ जायला नको म्हणून अनेक जण असेल तर स्वतःची नाहीतर भाड्याने चारचाकी गाड्या बुक करतात, या गाड्यांना टार्गेट करून अशी लुटारू मंडळी दुपारच्या वेळेत स्वतःजवळील पाणी संपल्याचा कांगावा करत गाड्या थांबवण्याचा प्रयत्न करतात.

एकदा गाडी थांबली कि त्यांच्याकडून खाण्यासाठी पैशाची याचना करतात. यांच्यासोबत असलेल्या महिला, लहान मुले, यांच्याकडे असलेल्या कपड्यांच्या बॅगा, हाती असलेले ध्वज यावरून हे खरेच देवदर्शनासाठी जात असल्याचा भास लोकांना होतो आणि लोक त्यांना खाण्यापिण्यासाठी पैसे देतात.

ती गाडी पुढे सरल्यानंतर काही वेळातच ते मागून येणाऱ्या गाड्यांना खुणावून पुन्हा त्याच पद्धतीने त्यांच्याकडूनही पैसे उकळतात. देवदर्शनासाठी जाणारी मंडळी भावनेच्या भरात यांना बऱ्यापैकी पैसे देतात आणि पुण्य केल्याचे समाधान पदरी पाडून घेतात ज्यामध्ये या मंडळींचा आयता लाभ होतो.

खरेतर हे पुण्यकर्म नसून या भामट्यांना आणखी भक्तांना लुटण्यासाठी दिलेले प्रोत्साहन असते त्यामुळे विशेषतः देवस्थानांना चारचाकी गाडीने जाणाऱ्या भाविकांनी या गोष्टीचे भान ठेवायला हवे. देवस्थानांच्या यात्रा जवळ आल्या कि अशाच प्रकारची काही मंडळी हाती टाळ आणि भगवे ध्वज घेऊन शहरांत घरोघरी जाऊन यात्रेसाठी पैसे मागताना दिसू लागतात.

आपल्याला यात्रेला जाणे शक्य नाही, ही मंडळी चालली आहेत तर निदान यांना तरी आर्थिक साहाय्य करून भगवंतांच्या चरणी आपली सेवा रुजू करावी या भोळ्या भावनेने श्रद्धाळू मंडळी यांना पैसे आणि अन्य साहाय्य करतात. वास्तविकता ही मंडळी लोकांकडून पैसे गोळा करून देवस्थानांना जातही नाहीत. शहरी भागात मागील काही महिन्यांपासून आणखी एक प्रकार प्रकर्षाने दिसू लागला आहे.

गर्दीच्या ठिकाणी काही महिला देवीची मूर्ती किंवा छायाचित्र ठेवलेले एक ताट किंवा ताम्हण हातात घेऊन पादचाऱ्यांना अडवताना दिसतात. ताट येणाऱ्या जाणाऱ्या सुशिक्षित लोकांसमोर धरून आम्ही देवीच्या यात्रेला जात असल्याचे सांगून ताटात पैसे टाकण्याची विनवणी करतात.

या महिला नीटनेटकी साडी नेसून अंगावर दागिने वगैरे परिधान करून असतात. रस्त्याने जाणाऱ्या सुशिक्षित पुरुषांना त्या विशेषकरून टार्गेट करतात. त्यांचा नीटनेटकेपणा पाहून पुरुष मंडळी त्यांच्यावर सहज विश्वास टाकून २०-५० किंवा १०० रुपयांची नोट बिनदिक्कतपणे ताटात ठेवतात. देवाधर्माचा आधार घेऊन पूर्वी देवस्थानांच्या ठिकाणी याचक मंडळी एक-दोन रुपये मागत असत, आता मात्र लोकांच्या धार्मिक भावनेचा गैरफायदा घेणारी आधुनिक लुटारू मंडळी सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात निर्माण होऊ लागली आहे.

लोकांचा देवभोळेपणा यांना दिवसागणिक श्रीमंत बनवत आहे. अशा मंडळींना दान देऊन आपल्याला काहीच लाभ न होता त्यांना मात्र बळ मिळत आहे. वाढत्या वयामुळे गलितगात्र झालेल्यांचे एकवेळ ठीक; मात्र हातपाय साबूत असताना भाविकांच्या धार्मिक भावनांचा लाभ घेऊन त्यांना लुटणाऱ्या या लुटारूना भगवंत त्यांच्या कमार्चे फळ देईलच मात्र अशा लोकांमुळे धमार्बाबत लोकांमध्ये गैरसमज निर्माण होऊ नये यासाठी भाविकांनी जागृत राहून त्यांना अद्दल घडवायला हवी.

# जगदीशचंद्र बोसः विद्युत चुंबकीय तरंगांचे संशोधक!

डॉ. सर जगदीशचंद्र बोस हे एक भारतीय जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ तसेच पुरातत्त्वज्ञ होते. भारतीय महान शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पती विषयावरील कार्य महान आहे. त्यांच्या अचाट संशोधनाबद्दलची अल्पशी पण रोचक माहिती.

------------

पूर्व बंगालमधील डाक्का जिल्ह्यातील राणीखल या खेडेगावात ३० नोव्हेंबर १८५८ रोजी जगदीशचंद्र बोस यांचा जन्म झाला. त्यांचे वडील भगवानचंद्र बसू हे सरकारी नोकरीत सब डिव्हिजनला ऑफिसर होते. त्या काळी इंग्रजीत जसे ठाकूरचे टागोर झाले, राय आडनावाचे रे झाले तसेच बसू आडनावाचे इंग्रजी स्पेलिंगप्रमाणे बोस झाले.

त्यांचे घराणे हे बंगाल प्रांतातील एक खानदानी घराणे होते. त्यांची आई साध्वी व सुशील होती. लहानपणापासूनच जगदीशचंद्र आजूबाजूचा निसर्ग पहायचे व त्याचे निरीक्षण करायचे. निसगार्तील अनेक गोष्टी पाहून त्या अशाच का? असा प्रश्न त्यांना पडे. भगवानचंद्र सुद्धा न कंटाळता छोट्या जगदीशने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देत असत. सर्व झाडे एकाच वेळी का फुले देत नाहीत? एखाद्या झाडाची पालवी पोपटी हिरवी पण दुस?याची तांबूस असा फरक का पडतो? असे त्यांना वाटे. झाडे, फुले, फुलपाखरे, भोवतीचा निसर्ग आदींचे निरीक्षण करणे, हा त्यांचा आवडता छंद होता.

डॉ. जगदीशचंद्र बोस हे कोलकाता येथील सेंट झेवियर शाळा आणि त्याच नावाच्या महाविद्यालयात शिकले. त्यानंतर इंग्लंडच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन वनस्पतिशास्त्र आणि निसर्गविज्ञानाचा अभ्यास पूर्ण करून ते भारतात परत आले.



या काळात त्यांना भौतिकशास्त्रज्ञ लॉर्ड रॅली यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ.बोस यांनी लिहिलेली पुस्तके- इरिटेबिलिटी ऑफ प्लँट्स, इलेक्ट्रो-फिजिओलॉजी ऑफ प्लँट्स, ट्रॉपिक मुव्हमेण्ट ॲण्ड ग्रोथ ऑफ प्लँट्स, दि नर्व्हस मेकॅनिझम ऑफ प्लँट्स, प्लँट रिस्पॉन्स, दि फिजिऑलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, दि मोटार मेकॅनिझम ऑफ प्लँट्स, रिस्पॉन्सेस इन दि लिव्हिंग ॲण्ड नॉन लिव्हिंग, लाइफ मुव्हमेण्ट्स ऑफ प्लँट्स- भाग १ ते ४ आदींचा समावेश आहे.



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

विद्युतशक्तीवरील संशोधनानंतर ते वनस्पतिशास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूतील साम्य आणि भेद याचा त्यांनी अभ्यास केला. स्नायू, मज्जातंतू, सुखदुःख आदी विकार यांचा वनस्पतीबाबत त्यांनी धांडोळा घेतला. डायामेट्रिकल कोन्ट्रॅक्शन ॲपरेटस, रेझोनंट रेकॉर्डर्स ही दोन उपकरणे तयार करुन त्यांनी त्यांच्या साहाय्याने थंडी, प्रकाश, विद्युत, उष्णता या घटकांचा वनस्पती व प्राणी यांच्यावरील परिणामांचा अभ्यास केला. वनस्पतींचे श्वसन, रुधिराभिसरण पद्धतीने होणारे त्यांच्यातील कार्य, अन्नाची ने-आण निरुपयोगी वस्तूंचा निचरा हे त्यांच्या संशोधनाचे विषय होते.

वनस्पतीमध्ये होणाऱ्या सूक्ष्म बदलांची माहिती ठेवून त्याच्या नियमित नोंदी त्यांनी ठेवल्या. त्यावर संशोधन केले. त्यांच्या याच संशोधनातून वनस्पतींना संवेदना असतात हे त्यांनी सिद्ध केले. भारतीय वैज्ञानिक सोहिनी चक्रबोर्ती यांनी २०१६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या संशोधनातून ही प्रक्रिया उलगडून दाखविली आहे.

वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी रेझोनंट रेकॉर्डर, ऑसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाऊंड लेव्हलर, क्रेसकोग्राफ, बॅलिन्सिंग ॲपरेट्स आदी उपकरणे तयार केले. इंग्लंड व कोलकाता येथील प्रेसिडेन्सी महाविद्यालयात १८८५ ते १९१५ अशी ३० वर्षे भौतिकशास्त्र विषय शिकवत असतानाच त्यांनी विद्युतशक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरंगांचा शोध घेऊन त्यांनी बॅटरी बनवली. या शोधाची कीर्ती सर्वदूर पसरली.

प्रसिद्ध शास्त्रज्ञ पोइंकर आणि जे.जे.थॉम्पसन यांच्या लिखाणात या शोधाचा उल्लेख आला आहे. नेमेलाइटच्या मदतीने संदेश पाठवण्यात त्यांना यश मिळाले होते. १८९६ मध्ये रेडिओ संदेश वहनाचे प्रयोग मार्कोनीने केले तर त्याच्या एक वर्षाआधीच जगदीशचंद्रजींनी ते केले होते. हे आता अमेरिकेस मान्य करावे लागत आहे.

डॉ. सर जगदीशचंद्र बोस यांनी सन १९१७मध्ये कोलकाता येथे बोस रिसर्च इन्स्टिट्यूट नावाची संस्था स्थापन करून एक मुखपत्रही सुरू केले. त्यांचे वयाच्या ७९व्या वर्षी २३ नोव्हेंबर १९३७ रोजी निधन झाले.

■ ■ ■

# आमदार-खासदारांना सन्मानाने वागवा सरकारी जीआचे औचित्य?

महाराष्ट्र सरकारने शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लोकप्रतिनिधीं सोबत सौजन्याने वागावे अशी अपेक्षा बाळगणे चुकीचे नाही.परंतु याचा अतिरेक होता कामा नये. लोकप्रतिनिधी तसेही अधिकारी व कर्मचारी लोकांना आपले चाकरमाने समजतात.त्यांना वाटेल तसे धारेवर धरतात. कुठलीही तमा कायदे असूनही बाळगत नाहीत. आता तर महाराष्ट्र सरकारने जीआर काढून त्याला नियमांमध्ये जखडून टाकले आहे.अधिकारी व कर्मचारी हे जनतेचे सेवक असले पाहिजेत.ते लोकप्रतिनिधींचे हुजरेगिरी करणारे चमचे नसले पाहिजेत.कारणं त्यांना दिला जाणारा पगार व इतर लाभ हे कररूपी उत्पन्नातून दिले जातात.

आमदार-खासदारांसाठी अधिका-यांनी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरूवारी दोन तासांचा राखीव वेळ ठेवून त्यांच्या प्रलंबित कामांचा आढावा घ्यावा. अशी अपेक्षा करणे चुकीचे वाटत नाही. हा वेळ लोकोपयोगी समस्या सोडविण्यासाठी कामी आणावा असे जनतेला वाटते आहे. परंतु लोकप्रतिनिधींना हा वेळ आपली बांधकामे,विकासकामे मार्गी लावण्यासाठी करावयाचा असेल याची दाट शक्यता वाटते आहे. आमदार - खासदारांनी संसदीय कामकाजाशी संबंधित मागितलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करून देणे आहे.

संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी सरकारी निदेर्शाचे पालन न केल्यास त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. आज बहुतांश सरकारी कार्यालयांमध्ये प्रभारी लोकांच्या खांद्यावर बंदुक ठेवून कामे करणे सुरू आहे. यामुळे बहुतांश कार्यालयांचा अतिरीक्त पदभार अधिकारी व कर्मचारी लोकांकडे आलेला आहे. यामुळे कुठलीही सरकारी कामें व्यवस्थित आणि वेळेत पुर्ण होने दुरापास्त झाले आहेत.

सरकारी खुर्च्या या अंडे उगविण्याचे माध्यम ठरत आहेत. आपले अधिकार लोकांच्या, जनतेच्या सेवेसाठी न वापरता ते अतिरिक्त कमाईसाठी वापरले जातात आहेत.याकडे लोकप्रतिनिधी कानाडोळा करीत असतात. त्यांच्या जे सोयीचे आहे तेच ते करतात. जनतेच्या प्रश्नांशी, कामांशी व अधिकाराशी त्यांना काहीही देणेघेणे नसते.ते निव्वळ आपला स्वार्थ साधत असतात. यासाठी अधिकारी व कर्मचारी वर्गावर आपला दबाव वाढविण्या साठीचा हा सर्व खेळ सुरू आहे. जनतेच्या समस्यांशी त्यांना काहीही करावयाचे नाही.

सरकारी अधिकारी,कर्मचारी हे जनतेचे सेवक आहेत. ते नोकरशहा आहेत.जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांची नियुक्ती ही पगारी तत्वावर केलेली असते.आज त्याचे पणं कंत्राटीकरण केले जात आहे. यामुळे अधिकारी लोकांना आपले अधिकार वापरता येत नाहीत. त्यांचेकडे सेवा संबंधाने कुठलीही तक्रार केली असता ते तक्रारीचे निराकरण करणे टाळतात?. टोल फ्री नंबर वर तर नुसती टोलवाटोलवी सुरू असते.अखेर तक्रारदार कंटाळून स्वतः परास्त होत असतो.



मिलिंद गड्डमवार
(मुक्त पत्रकार)
राजुरा जि. चंद्रपूर.
9511215200

सरकारी अधिकारी,कर्मचारी हे शिक्षीत,उच्च शिक्षीत असतात. त्यांना सरकारी नियमांचे पालन करणे बंधनकारक असते. परंतु असे असले तरीही आपला रूबाब कसण्यासाठी,नियमबाह्य कामें करवून घेण्यासाठीचा हा नवा फंडा राज्य सरकार या जीआरच्या आडून अंमलात आणू पहात आहेत.

यामुळे जनतेचे कुठलेही भले होणार नाही आहे.जनतेची कामें वेगाने व वेळेत होणार नाही आहेत.जनतेला वेळेत न्याय मिळणार नाही आहे.आपले महत्व वाढविण्यासाठीचा हा छुपा अजेंडा आहे. नोकरशहा हे जनतेचे सेवक आहेत.ते मालक नाहीत.तरीही ते मालकासारखे वागतात. जनतेची कामें आर्थिक लाभाशिवाय केली जात नाहीत. याकडे लोकप्रतिनिधी लक्ष देणार आहेत? आपली अवैध कामें विना अडथळ्याने करवून घेण्यासाठीचा हा एक छुपा अजेंडा आहे. मान हा मागून मिळत नसतो. तो मिळवावा लागतो! या तत्वाला मागे सारून बळजबरीने मान मिळविण्याचा हा सरकारी प्रयत्न निंदनीय व तिरस्करणीय वाटतो आहे. याचा पुर्नविचार व्हावा हीच रास्त अपेक्षा आहे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### ऐतिहासिक वास्तूंची निगा राखणे गरजेचे

आम्ही काही दिवसांपूर्वी अलिबागच्या समुद्रातील कुलाबा किल्ला यावर गेलो होतो. त्यावर आम्हाला कचरा दिसला. कुलाबा किल्ला हा एक ऐतिहासिक किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी तो किल्ला बांधला आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी त्याचे बांधकाम पूर्ण केले. तिथे श्री भवानी मातेचे मंदिर पण आहे. आपण सर्वांनी सर्व गडदुर्गांचे रक्षण केले पाहिजे. कुलाबा किल्ला किंवा मग दुसरे किल्ले येथे स्वच्छता राखली पाहिजे, वेळोवेळी त्याला दुरुस्त केले पाहिजे.

■ अथर्व अमित देखणे
इयत्ता ५ वी, नवीन पनवेल.

### निरोगी व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रकर्म!

जीवन वाचवणारा, जीवन जगण्याची आशा देणारा आणि मानवतेची सेवा करणारा सर्वोच्च असा व्यवसाय करणाऱ्यांना देवमाणूस असे म्हटले जाते. व्यक्ती मरणासन्न स्थितीत असताना त्याच्यावर योग्य उपचार करून रुग्णाला जीवनदान देणारे डॉक्टर देवमाणूसच आहेत. असे असताना वैद्यकीय क्षेत्रातील गैरप्रकार जेव्हा उघडकीस येतात, तेव्हा मनात भीती निर्माण होते.

नुकताच गुजरात येथे झालेला एक गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. येथील ख्राजेसीसी हार्ट इन्स्टिट्यूटने चक्क ८०० निरोगी व्यक्तींच्या हृदयाची शस्त्रकर्मे करून त्यांच्या हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत स्टेंट म्हणजे नळी घातली आहे. हे कशासाठी केले, तर ह्यप्रधानमंत्री जनआरोग्य योजनेह्नतून मिळणारे पैसे कमावण्यासाठी म्हणजेच स्वतःचे खिसे भरण्यासाठी निरोगी व्यक्तींच्या शरीराशी असा नीच खेळ खेळला गेला. २-३ नव्हे, तर शेकडो व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रकर्म करण्यात आले. या प्रकरणामुळे चाचणी करणारे, अहवाल देणारे, तसेच संपूर्ण वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आतापर्यंत डॉक्टरांनी अनावश्यक चाचण्या करण्यास सांगितल्या, महागडी औषधे दिली, अतिरिक्त शुल्क आकारले आणि कमी अधिक प्रमाणात अनावश्यक शस्त्रकर्म करण्यास सांगितले, अशा घटना घडत होत्या. मात्र गुजरातमधील घटनेने वैद्यकीय क्षेत्राला काळिमा फासला आहे. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची समिती नेमणे, त्यांनी शंकास्पद रुग्णालयांना अचानक भेटी देणे, तेथील व्यवस्था आणि चाचण्यांची कागदपत्रे तपासणे अत्यावश्यक आहे. तसेच वैद्यकीय शिक्षणात प्रवेश देताना केवळ परीक्षेतील गुण हा एकमेव निकष न ठेवता, नीतिमत्ता आणि चांगले आचरण हे निकषही असायला हवेत.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा

# अंड्यातील पिवळा भाग खाणे आरोग्यदायी की हानिकारक?



अंडी हा नाश्त्यातील सर्वात सामान्य आणि आवडता पर्याय मानला जातो. तुमच्या आहारात अंडी समाविष्ट करणे आणि ती संपूर्ण खाणे हा एक अतिशय आरोग्यदायी पर्याय आहे. तथापि, बरेच लोक संपूर्ण अंडी खात नाहीत. लोक अंड्यातील पिवळ्या भागाचे सेवन टाळतात कारण त्यात चरबी आणि कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असते.

काहींच्या मते अंड्यातील पिवळा भाग शरीरात उष्णता निर्माण करतो. म्हणून ते टाळले पाहिजे. पण यामागे नक्की सत्य काय आहे हे जाणून घेऊयात.

अंड्यातील पिवळ्या भागामध्ये हृदयासाठी निरोगी चरबी आणि चांगले कोलेस्ट्रॉल असते, जे तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. प्रथिनांच्या चांगल्या प्रमाणात प्रमाणाव्यतिरिक्त, अंड्यातील पिवळ्या भागामध्ये ओमेगा-३ ॲसिड सह हृदयासाठी निरोगी असंतृप्त चरबी देखील असतात.



अंड्यातील पिवळ्या भागात रिबोफ्लेविन, जीवनसत्त्वे आणि व्हिटॅमिन बी-१२ सारखे पोषक घटक असतात. त्यात लोह देखील असते. म्हणून, जर तुम्ही अंड्यातील पिवळा भाग काढून टाकलात तर हे पोषक घटकही शरीराला मिळणार नाही.

अंड्यातील पिवळ्या भागामध्ये चांगले कोलेस्ट्रॉल असते. आपल्या शरीराला टेस्टोस्टेरॉन तयार करण्यासाठी कोलेस्टेरॉलची आवश्यकता असते, जे उर्जेची पातळी वाढवण्यास आणि स्नायू तयार करण्यास मदत करते. एका अंड्यामध्ये सुमारे 186 मिलीग्राम कोलेस्टेरॉल असते, जे फक्त पिवळ्या पिवळ्या रंगात आढळते.

एका अभ्यासात असे आढळून आले आहे की अंड्यातील पिवळ्या भागातील चरबी शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. जरी तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तरी जोपर्यंत तुमचे पोषणतज्ज्ञ तुम्हाला तसे करण्याचा सल्ला देत नाहीत तोपर्यंत अंड्यातील पिवळा भाग काढून टाकू नये.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### टेकनिक

पाच वर्ष लाटायचे
एक वर्ष वाटायचे
तरी आपण प्लसमध्ये
कशाला टेन्शन घ्यायचे?

हे साधं सुत्र लक्षात घेऊन
भावी उमेदवार भाळले
आपले भाग्य आजमाया
निवडणूकित ऊभे राहीले ..

निवडणूका येता जवळ
सुरु होती पदयात्रा मेळावे
नेत्यांना एकच ध्यास
जनतेपुढे कसे प्रगटावे ..!

